



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २८२ * नांदेड * शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211







## जरांगेंचा काल ५०० कोटींचा आरोप, आज ऑडिओ क्लिप ऐकवली

### आता यातील लोक कोण? सत्तेत असलेल्या फडणवीस-शिंदेंनी शोधावं! जरांगेंचं आव्हान

**जालना (प्रतिनिधी)–** बीडमध्ये मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा पार पडला, बीडमधील नारायणगडावरील दसरा मेळाव्यातून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तुम्ही मला ५०० कोटी रुपये दिले, अशी चर्चा भाजप नेत्यांमध्ये आहे, त्याबाबत आजच्या मेळाव्यातून उत्तर द्या, असा सवाल जरांगे पाटलांनी विचारला. त्यानंतर आता या प्रकरणी आज मनोज जरांगेंनी पत्रकार परिषद घेत याबाबत पुरावे दाखवतो असं म्हणत एक ऑडिओ क्लिप ऐकवली आहे.

यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, सलग तीन वर्षापासून आजपर्यंत सारखं माझ्या विरोधात षड्यंत्र सुरू आहे. हे षडयंत्र माझ्या मायबाप समाजापुढे जायला पाहिजे. हे किती मोठे हे प्रकरण आहे, मी किती वेदना सहन करत आलो आहे, हे मराठा समाजापुढे गेलं पाहिजे. मराठ्यांचं आंदोलन अन्याय करून बंद पडायचं, जाणून बुजून मराठ्यांना त्रास द्यायचा. कसे षडयंत्र रचले जात आहे, हे मराठा समाजापुढे येणार आहे, निवडणुकीच्या काळामध्ये, उपोषणाच्या काळात देखील षडयंत्र झाले. आंदोलनाच्या काळात ही षडयंत्र झाले आहे, किती मोठे डाव रचले जात आहेत. हे यातून कळत आहे, राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक मराठा समाजाने हे लक्षात घ्यावे, माझ्यासोबत दुष्मणासारखे वागत आहेत. एवढ्या भयंकर स्वरूपाचे षडयंत्र का रचले जाते आहे, याचा शोध पंतप्रधानांनी, मुख्यमंत्र्यांनी यांनी, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी घ्यावा, असंही पुढे मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.

#### ऑडिओ क्लिपची चौकशी झाली पाहिजे –मंत्री उदय सामंत

मनोज जरांगे पाटील यांनी ऑडिओ क्लिपबाबत शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे, कोल्हापुरात पत्रकार परिषदेत बोलताना सामंत म्हणाले, ऑडीओ क्लिपमध्ये भाजपाच्या म्हणजे आमच्या मित्र पक्षाच्या संबंधित लोकांची नाव देखील आहेत आणि म्हणून या पत्रकार परिषदेतून मी माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांकडे शिवसेनेच्या वतीने मागणी करतोय की, या पूर्ण ऑडिओ क्लिपची चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

## आज औरंगाबाद पदवीधर मतदार संघासाठी मतदान

- नांदेड जिल्ह्यात १२० मतदान केंद्रांवर होणार मतदान
- मराठवाडयातील आठ जिल्ह्यांतील ८४२ केंद्रांवर मतदान
- मतपेट्या, मतदान साहित्यासह पथके केंद्रांकडे रवाना

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेच्या ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नांदेड जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांवर आज शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी ३६ हजार ६८७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानपूर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक साहित्याचे वाटप नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये करण्यात आले. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पडावी, यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन केले आहे.

जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांसाठी १२० मतदान केंद्राध्यक्ष आणि त्यांच्या सहाय्यासाठी ६३० मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि. २२ ऑक्टोबर रोजी प्रशिक्षण देण्यात येत असून, मतदान साहित्याचे वाटप करून त्यांना संबंधित मतदान केंद्रांवर रवाना करण्यात आले आहे. मतदान प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी ५५ क्षेत्रीय अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदानाची वेळ संपल्यानंतर सर्व मतदान पथके मतदानपेट्या सीलबंद करून नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनमधील सुरक्षित कक्षात जमा करतील. त्यानंतर सर्व मतदानपेट्या पोलीस बंदोबस्तात छत्रपती संभाजीनगर येथील सुरक्षित कक्षात नेऊन जमा करण्यात येणार आहेत. या प्रक्रियेच्या समन्वयासाठी देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदान प्रक्रिया निर्भय, निष्पक्ष व सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेड जिल्ह्यातील सर्व पदवीधर मतदारांना शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क आवर्जून बजावण्याचे आवाहन केले आहे.

#### आठ जिल्ह्यांत ८४२ मतदान केंद्रे

मतदारसंघात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २१७, जालना ८९, परभणी ७६, हिंगोली ३६, नांदेड १२०, लातूर ८८, धाराशिव ७६ व बीड जिल्ह्यात १४० अशी एकूण ८४२ मतदान केंद्रे आहेत. या निवडणुकीसाठी ४१ उमेदवार रिंगणात असून, एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदवून मतदान करावयाचे आहे.

## साखर आयातीस केंद्राकडून दोन महिन्यांची मुदतवाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** परकीय व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) दहा लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीसाठीची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे. आता आयातदारांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शुल्कमुक्त आयात पूर्ण करता येईल. यापूर्वीची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी निश्चित होती. हा निर्णय १९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या डीजीएफटीच्या अधिसूचना क्रमांक ४५/२०२६-२७ द्वारे जाहीर करण्यात आला.

## सौदी अरेबियातील दम्माम विमानतळ आणि अरामको तेल प्रकल्पावर हल्ले; ३ जणांचा मृत्यू, १० जण जखमी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सौदी अरेबियाच्या पूर्व भागातील एका विमानतळावर आणि तेल प्रकल्पावर झालेल्या हल्ल्यांत तीन जण ठार तर १० जण जखमी झाले आहेत.

गुरूवारी मध्यरात्रीच्या दरम्यान दम्माम शहरातील 'किंग फहद आंतरराष्ट्रीय विमानतळावर हल्ला झाला. ज्यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला. सौदीच्या 'जनरल अथॉरिटी ऑफ सिव्हिल एव्हिएशन'ने दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत १० जण जखमी झाले आहेत. हल्ल्यामागे कोणाचा हात आहे, हे अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नसले तरी, अलीकडच्या काळात येमेनमधील हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियातील विमानतळांना वारंवार लक्ष्य केले आहे.

इराणचे समर्थन असलेल्या हुथी बंडखोरांनी या हल्ल्याबाबत अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. सौदी विमान वाहतूक प्राधिकरणाने सांगितले की, जखमींपैकी काहींना किरकोळ, तर काहींना गंभीर दुखापत झाली आहे. विमानतळाचे किती नुकसान झाले आहे, याचा आढावा सध्या घेतला जात आहे.



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर गुरूवारी मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील विविध मतदान केंद्रांवर मतदानाचे साहित्य घेऊन जाताना कर्मचारी दिसत आहेत.

## तिबेटमध्ये शक्तिशाली भूकंप, मोठ्या प्रमाणात वित्त व जीवितहानी झाल्याची शक्यता

**तिबेट (वृत्तसंस्था)–** तिबेटमध्ये मोठा भूकंप झाल्याची घटना घडली आहे. भूकंप झालेला प्रदेश हा चीनच्या ताब्यात आहे. मिळालेल्या माहितीनुसार ७.० रिश्टर स्केलचा मोठा भूकंपाचा धक्का बसला आहे. मोठी वित्त व जीवित हानी झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आठ वाजून तीन मिनिटांनी हा भूकंपाचा धक्का बसला आहे.



तिबेटमध्ये ७.० रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला आहे. मिळालेल्या माहिती भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली १७३ किलोमीटर खोल होता. दरम्यान, बाधित भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

यापूर्वी ८ सप्टेंबर रोजी भारताचा शेजारी देश नेपाळमध्ये भूकंप झाला होता. तिबेट आणि नेपाळच्या आसपासचा प्रदेश भूकंपप्रवण मानला जातो. २६ ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेजवळ भूस्खलनामुळे मोठा पूर आला होता, ज्यामध्ये घरे, रस्ते आणि पूल वाहून गेले. यात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण बेपत्ता झाले. तेव्हापासून बाधित भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

२०२५ मध्ये, तिबेटमध्ये ७ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्यात सुमारे १०० लोकांचा मृत्यू झाला आणि १००० घरांचे नुकसान झाले. भूकंपाचा केंद्रबिंदू माउंट एव्हरेस्टच्या ईशान्येला अंदाजे ७५ किलोमीटर अंतरावर आणि नेपाळच्या जवळ होता. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे नुसार, गेल्या शतकात प्रभावित क्षेत्रात ६ तीव्रतेचे किमान १० भूकंप झाले आहेत.

तिबेट प्रदेश त्याच्या भूकंपीय हालचालींसाठी ओळखला जातो. हे भारतीय आणि युरेशियन टेक्टॉनिक प्लेट्सच्या टक्करीमुळे होते, ज्यातून हिमालयाची निर्मिती झाली. ऐतिहासिक आकडेवारी दर्शवते की या प्रदेशात अनेक भूकंपीय हालचाली झाल्या आहेत, ज्यामुळे तो सर्वात जास्त भूकंपीय सक्रिय प्रदेशांपैकी एक बनला आहे.

## आसना गार्डन प्रशासकीय वादात नष्ट होण्याच्या मार्गावर; गार्डन बकाल अवस्थेकडे!

### झाडे सुकू लागली







**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील चैतन्यनगर ते विमानतळ रोड महामार्गालगत सार्वजनिक बांधकाम विभागाने विकसित केलेले १,७३६ मीटर अर्थात पावणेदोन किलोमीटर लांबीचे 'आसना गार्डन' विकासाचे काम मार्च २०२६ अखेर पूर्ण झाले. नियमानुसार गार्डन नांदेड महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एप्रिल २०२६ पासून आजपर्यंत एकूण चार पत्रं महापालिकेला दिली आहेत. महापालिका मात्र, प्रत्येक वेळी काही ना काही त्रुटी काढून हस्तांतरणाची प्रक्रिया टाळत आहे, असा आरोप करण्यात येत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिका या दोन शासकीय यंत्रणांमधील हस्तांतरणाच्या वादात 'आसना गार्डन' मृत्यूशय्येवर पडले आहे! गार्डनमधील हिरवळ, झाड, झुडूप वाळत आहेत, असा आरोप या भागातील आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे अध्यक्ष आनंद कल्याणकर यांनी केला आहे. गार्डनच्या जागेची मालकी महापालिकेची आहे. या नात्याने महापालिकने गार्डनमधील दिवाबत्ती तसेच मोटार लाऊन ठिबक संच चालवण्यासाठी वीज जोडणी अर्थात मीटर घेणे आवश्यक आहे.

आजपर्यंत नांदेड महापालिकेने वीज वितरण कंपनीकडे वीज जोडणीसाठी अर्ज केला नाही. त्यामुळे गार्डनमधील सिंचन व्यवस्था कोलमडली आहे. झाडं, झुडूपं, हिरवळ वाळायला लागली आहे. गार्डनमधील शोभेच्या झाडांवर कीटकनाशकांची फवारणी होत नसल्याने झाडेझुडपे आणि हिरवळ रोगराईच्या विळख्यात सापडली आहेत. अनेक ठिकाणी हिरवळ जळून जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही शासकीय यंत्रणा गार्डनची योग्य देखभाल करण्यात असमर्थ ठरत असल्याचे चित्र निर्माण झालं आहे, असाही आरोप कल्याणकर यांनी केला आहे.

प्रशासकीय वादात या सुंदर गार्डनचा बळी जाणार असेल, तर ते वाचविण्यासाठी गार्डनची व्यवस्था एखाद्या सक्षम स्वयंसेवी संस्थेकडे सोपवावी, अशी मागणी आनंद कल्याणकर यांनी केली आहे.






## इथेनॉल उत्पादन बंदीवर केंद्र सरकारचे शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इथेनॉल पुरवठा वर्ष २०२६ २७ मध्ये साखरेचे इथेनॉलमध्ये रुपांतर करण्यास केंद्र सरकारने बंदी घातली आहे. आगामी इथेनॉल पुरवठा वर्षात उसाचा रस आणि बी हेवी मळीपासून इथेनॉल उत्पादन करण्यास साखर कारखाने आणि डिस्टिलरींना परवानगी नाही, असे स्पष्ट आदेश केंद्र सरकारच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने दिला आहे.

केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या उप सचिव सुरेश कुमार नायक यांनी २२ ऑक्टोबर रोजी या बाबतचे पत्र जारी केले आहे.

देशातील सर्व साखर उत्पादक राज्ये, साखर आयुक्तालये, कारखाने आणि डिस्टिलरींच्या प्रमुखांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे, १ नोव्हेंबर २०२६ ते ३१ ऑक्टोबर या इथेनॉल पुरवठा वर्षात साखरेचे इथेनॉलमध्ये रूपांतर करण्यास परवानगी नाही. उसाचा रस आणि बी हेवी मळीचा वापर करून इथेनॉल उत्पादन करण्यास बंदी आहे. हा निर्णय घेण्यामागील कारणे, इथेनॉल उत्पादनासाठी पर्यायी कच्च्या मालाचा वापर करता येणार आहे की नाही, तसेच अन्य प्रकारच्या मळीपासून इथेनॉल निर्मितीबाबत कोणते नियम लागू असतील, या बाबत या पत्रात स्पष्टपणे काहीच उल्लेख करण्यात आलेला नाही. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना चालू वर्षात ७,००० कोटी रुपयांहून अधिकचा महसूल बुडणार असल्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

## किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

### १७ विरुद्ध १ मतांनी गजानन मुंडे यांना धक्का



**किनवट (प्रतिनिधी) –** तब्बल दीड कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारात अडकलेल्या किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव चार महिन्यांच्या नाट्यमय घडामोडींनंतर अखेर गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी आयोजित विशेष सभेत १७ विरुद्ध १ अशा मतांनी मंजूर झाला. या ठरावामुळे बाजार समितीच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत तब्बल १ कोटी ५२ लाख रुपयांचा गैरव्यवहार जून महिन्याच्या अखेरीस उजेडात आला.त्यानंतर बाजार समितीचे सभापती व संचालकांत आरोप - प्रत्यारोप आणि तक्रार,प्रती तक्रारीनंतर बाजार समितीच्या संचालकांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम २३-अ अन्वये सभापती गजानन मुंडे यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. संचालकांनी सदर प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल न करता जिल्हा निबंधकांकडे दाखल केला होता.याविरोधात सभापती मुंडे यांनी न्यायालयात दाद मागत दोनवेळा विशेष बैठकीवर स्थगिती आणण्यात यश मिळविले होते. आर्थिक गैरव्यवहार न्यायप्रविष्ठ असताना या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी गुरुवारी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्बाजार समितीच्या कार्यालयात तहसीलदार तथा पीठासन अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलाविण्यात आली होती.सभेसाठी आवश्यक गणपूर्ती पूर्ण झाल्यानंतर अविश्वास प्रस्तावावरील कार्यवाही सुरू करण्यात आली. हात उंचावून घेण्यात आलेल्या मतदानात १८ संचालकांनी सहभाग घेतला. त्यापैकी १७ संचालकांनी अविश्वास (पान ३ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

## समान नागरी कायदा : समान भारताची गरज

देशात भाजपच्या नेतृत्त्वाखालील सरकार सत्तेत असताना समान नागरी कायद्याचा मुद्दा पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजप किंवा मित्रपक्षांची सत्ता असलेल्या २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू करण्याची घोषणा केली आहे. ही घोषणा केवळ राजकीय आश्वासन म्हणून न पाहता, भारताच्या संविधानातील समानता, धर्मनिरपेक्षता आणि नागरिकांच्या समान हक्कांच्या व्यापक चौकटीतून पाहण्याची गरज आहे. भारत हा विविध धर्म, पंथ, भाषा, संस्कृती आणि परंपरांचा देश आहे. ही विविधता भारताची ताकद आहे. मात्र विवाह, घटस्फोट, वारसा, दत्तक, पोटगी यांसारख्या वैयक्तिक नागरी बाबींमध्ये धर्माधारित वेगवेगळे कायदे अस्तित्वात असतील, तर 'समान नागरिकत्त्व' या संकल्पनेसमोर प्रश्न निर्माण होतो. समान नागरी कायद्याचा मूलभूत उद्देश कोणत्याही धर्माला लक्ष्य करणे नसून, प्रत्येक नागरिकासाठी समान नागरी हक्क आणि समान कायदेशीर चौकट निर्माण करणे हा असला पाहिजे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्याने नागरिकांसाठी समान नागरी संहिता मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, असे मार्गदर्शक तत्त्व नमूद आहे. त्यामुळे समान नागरी कायदा ही अचानक निर्माण झालेली राजकीय कल्पना नाही. संविधान-निर्मात्यांनीही भारताच्या भविष्यातील कायदेव्यवस्थे-बाबत या विषयाचा विचार केला होता. समान नागरी कायदा लागू करताना सर्वांत महत्त्वाचा प्रश्न त्याच्या आशयाचा आणि अंमलबजावणीच्या पद्धतीचा आहे. कायदा समान असला पाहिजे, पण तो न्याय्यही असला पाहिजे. महिलांचे हक्क, मुलांचे संरक्षण, संपत्तीतील समान अधिकार, विवाहातील स्वातंत्र्य आणि घटस्फोटानंतरची आर्थिक सुरक्षितता यांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. कोणत्याही धर्मातील स्त्रीवर अन्याय करणारी प्रथा केवळ 'परंपरा' म्हणून स्वीकारता येणार नाही. मुस्लीम समाजातील 'तीन तलाक' प्रथेवर बंदी घालण्याचा निर्णय हा याच व्यापक चर्चेतील एक टप्पा होता. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी किंवा अन्य कोणत्याही समुदायातील महिलांना समान नागरिकत्त्व आणि संपत्तीचे अधिकार मिळणे आवश्यक आहे. कायद्यापुढे नागरिकाची ओळख प्रथम 'भारतीय नागरिक' अशी असावी; त्यानंतर त्याचा धर्म किंवा पंथ. तथापि, समान नागरी कायदा आणताना सामाजिक संवाद टाळता कामा नये. धार्मिक संस्था, महिला संघटना, कायदेतज्ज्ञ, आदिवासी समाज, विविध राज्ये आणि सर्व राजकीय पक्षांशी व्यापक चर्चा झाली पाहिजे. भारतातील काही आदिवासी आणि स्थानिक समुदायांच्या विशिष्ट प्रथा व परंपरांचाही संवेदनशीलपणे विचार करावा लागेल. एकसमान कायदा म्हणजे विविधतेचा नाश नव्हे; तर नागरी हक्कांमध्ये समानता आणि सांस्कृतिक जीवनात आवश्यक स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे होय. भाजप सरकारने २०२९ पर्यंत २१ राज्यांमध्ये हा कायदा लागू करण्याचे लक्ष्य ठेवले असेल, तर त्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी नाही. स्पष्ट मसुदा, सार्वजनिक चर्चा, घटनात्मक कसोटी आणि प्रभावी अंमलबजावणीची यंत्रणा आवश्यक आहे अन्यथा समान नागरी कायदा हा सामाजिक सुधारणेचा विषय न राहता निवडणुकीतील ध्रुवीकरणाचे साधन बनण्याचा धोका आहे. एनआरसी, घुसखोरी, कलम ३७० रद्द करणे, तीन तलाकविरोधी कायदा अशा मुद्द्यांसोबत समान नागरी कायद्याचा उल्लेख होत असला तरी प्रत्येक विषयाची स्वतंत्र घटनात्मक आणि सामाजिक चिकित्सा झाली पाहिजे. अवैध घुसखोरी रोखणे हा राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे; तर समान नागरी कायदा हा नागरिकांच्या वैयक्तिक कायद्यांतील समानतेचा प्रश्न आहे. दोन्हींची राजकीय सरमिसळ करण्याऐवजी त्यांच्यावर स्वतंत्र आणि तथ्याधारित चर्चा होणे देशहिताचे ठरेल. भारताला समानतेचा कायदा हवा आहे, पण समानतेच्या नावाखाली कोणत्याही समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करणारा कायदा नको. समान नागरी कायद्याची खरी कसोटी ही कोणत्या पक्षाने तो आणला यावर नव्हे, तर त्यातून सामान्य नागरिकाला, विशेषतः महिलांना आणि वंचितांना, किती न्याय मिळतो यावर ठरेल. २०२९ ची अंतिम मुदत महत्त्वाची असली तरी त्याहून महत्त्वाचे आहे सर्व नागरिकांना समान न्याय देणारा, संविधानाच्या मूल्यांशी सुसंगत आणि सामाजिक स्वीकारार्ह असा कायदा निर्माण करणे. धर्म वेगळे असू शकतात, श्रद्धा वेगळ्या असू शकतात, परंपरा वेगळ्या असू शकतात; पण नागरिकांचे मूलभूत नागरी हक्क समान असणे हीच आधुनिक लोकशाहीची खरी ओळख आहे.

# ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देणारी पहिली महिला स्वातंत्र्य सेनानी-राणी कित्तूर चेन्नम्मा



भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनेक शूरवीरांनी आपल्या प्राणांची बाजी लावून परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष केला. या शूरवीरांमध्ये कित्तूरच्या राणी चेन्नम्मा यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांना विरोध करून आपल्या राज्याचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा दिला. त्यांच्या धैर्याने, स्वाभिमानाने आणि देशप्रेमाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात एक प्रेरणादायी अध्याय निर्माण केला.

राणी चेन्नम्मा यांचा जन्म २३ ऑक्टोबर १७७८ रोजी कर्नाटकातील तत्कालीन बेळगाव जिल्ह्यातील काकाटी या गावात झाला. धुळप्पा आणि पद्मावती यांच्या पोटी जन्मलेल्या चेन्नम्मा या लहानपणापासूनच बुद्धिमान, धाडसी आणि चुणचुणीत होत्या. 'चेन्नम्मा' या नावाचा अर्थ सुंदर कन्या असा होतो. मात्र, त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ सौंदर्यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रबळ इच्छाशक्ती होती. त्यांनी संस्कृत, कन्नड, मराठी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्या काळात मुलींना शिक्षणाच्या आणि युद्धकौशल्याच्या फारशा संधी उपलब्ध नसतानाही चेन्नम्मा यांनी घोडेस्वारी, तलवारबाजी, तिरंदाजी आणि युद्धतंत्राचे प्रशिक्षण घेतले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह कित्तूरचे राजे मल्लसर्जा देसाई यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या कित्तूरच्या राणी बनल्या. राजघराण्याच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी राज्यकारभाराचे ज्ञान मिळवले आणि प्रजेच्या हिताला महत्त्व दिले. राणी चेन्नम्मा यांच्या आयुष्यात १८१६ मध्ये पतीचे निधन झाल्यामुळे मोठे दुःख कोसळले. त्यानंतर १८२४ मध्ये त्यांच्या एकुलत्या एका मुलाचाही मृत्यू झाला. वैयक्तिक आयुष्यातील या आघातांनंतरही त्यांनी राज्याच्या भविष्याची चिंता सोडली नाही. कित्तूरच्या राजगादीचा वारसा कायम राहावा, या उद्देशाने त्यांनी शिवलिंगप्पा या मुलाला दत्तक घेतले. मात्र, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतीय संस्थानांवर आपले नियंत्रण वाढवायचे होते. भारतीय राजघराण्यांच्या वारसाहक्कात हस्तक्षेप करून त्यांची राज्ये ताब्यात घेण्याचे धोरण ब्रिटिशांनी अवलंबले होते. ब्रिटिशांनी शिवलिंगप्पाला वारसदार म्हणून मान्यता देण्यास नकार दिला. राणी चेन्नम्मा यांनी हा अन्याय स्वीकारला नाही.

कित्तूरचे प्रशासन ब्रिटिशांच्या ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेत जिल्हाधिकारी सेंट जॉन ठाकरे आणि आयुक्त सर चॅपलिन यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी राणी चेन्नम्मा आणि दत्तक वारस शिवलिंगप्पा यांच्या अधिकारांकडे दुर्लक्ष केले. राणीने आपल्या राज्यावरील हक्क सोडावा, असा ब्रिटिशांचा आग्रह होता. परंतु चेन्नम्मा यांनी स्पष्टपणे विरोध केला. ऑक्टोबर १८२४ मध्ये ब्रिटिश सैन्याने मोठ्या लष्करी ताकदीसह कित्तूरवर हल्ला केला. ब्रिटिशांकडे हजारो सैनिक, बंदुका आणि तोफखाना होता. त्यांच्यासमोर कित्तूरचे सैन्य संख्येने कमी असले, तरी राणीच्या नेतृत्वाखाली सैनिकांनी प्रचंड धैर्याने प्रतिकार केला. या पहिल्या युद्धात ब्रिटिश सैन्याचे मोठे नुकसान झाले. ब्रिटिश अधिकारी सेंट जॉन ठाकरे यांचाही मृत्यू झाला. राणीच्या सैन्यातील सेनापती अमातूर बाळाप्पा यांनी या लढाईत महत्त्व-पूर्ण कामगिरी बजावली. ब्रिटिश अधिकारी वॉल्टर इलियट आणि स्टीव्हनसन यांनाही कित्तूरच्या सैन्याने ताब्यात घेतले. या विजयामुळे राणी चेन्नम्मा यांच्या शौर्याची चर्चा सर्वत्र होऊ लागली.

पहिल्या लढाईनंतर अधिक रक्तपात होऊ नये, या हेतूने राणी चेन्नम्मा यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांशी वाटाघाटी केल्या. कैदेत असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची सुटका करून युद्ध थांबवण्याचा प्रयत्नही केला. मात्र, ब्रिटिशांनी या संधीचा उपयोग शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी केला नाही. पहिल्या पराभवाचा अपमान सहन न झाल्याने ब्रिटिशांनी अधिक मोठे सैन्य जमवले. म्हैसूर आणि सोलापूरकडून अतिरिक्त सैन्य आणून कित्तूरवर पुन्हा आक्रमण करण्यात आले. या वेळी राणी चेन्नम्मा यांनी सांगोली रायण्णा आणि गुरुसिद्धप्पा यांसारख्या निष्ठावान सेनापतींच्या मदतीने प्रतिकार केला. दुसऱ्या युद्धातही कित्तूरच्या सैनिकांनी शर्थीने लढा दिला. अनेक दिवस किल्ल्याचे रक्षण करण्याचा प्रयत्न सुरू होता. परंतु अंतर्गत फितुरीमुळे राणीच्या सैन्याला मोठा धक्का बसला. ब्रिटिशांच्या प्रचंड सैन्यबळासमोर कित्तूरच्या सैन्याची ताकद अपुरी पडली. अखेर राणी चेन्नम्मा यांचा पराभव झाला आणि ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. त्यानंतर त्यांना बेळहोंगल किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. राणी चेन्नम्मा यांना आयुष्याची अखेरची सुमारे पाच वर्षे बेळहोंगलच्या किल्ल्यात बंदिवासात घालवावी लागली. आपल्या राज्यापासून, प्रजेपासून आणि स्वातंत्र्यापासून दूर राहण्याची वेळ त्यांच्यावर आली. तरीही त्यांनी आपले मनोधैर्य गमावले नाही. या काळात त्यांनी धार्मिक ग्रंथांचे वाचन, पूजाअर्चा आणि आध्यात्मिक चिंतन यांत वेळ व्यतीत केला. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी बेळहोंगल किल्ल्यात त्यांचे निधन झाले. ब्रिटिशांनी त्यांचा लढा दडपला असला, तरी त्यांच्या शौर्याची ज्योत विझवता आली नाही. राणी चेन्नम्मा यांचे जीवन म्हणजे संकटांपुढे न झुकता स्वाभिमानासाठी संघर्ष करण्याचा आदर्श आहे. राणी चेन्नम्मा यांना कैद करण्यात आले, तरी कित्तूरचे स्वातंत्र्य मिळवण्याची धडपड संपली नव्हती. त्यांचे निष्ठावान सेनापती सांगोली रायण्णा यांनी पुढेही ब्रिटिशांविरुद्ध गनिमी काव्याने लढा सुरू ठेवला. राणीच्या दत्तक पुत्राला शिवलिंगप्पाला कित्तूरच्या गादीवर बसवणे, हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. १८२९ पर्यंत त्यांनी ब्रिटिशांना आव्हान देण्याचे प्रयत्न चालू ठेवले. मात्र, ब्रिटिशांनी त्यांच्यावरही कारवाई केली. रायण्णा यांना पकडून फाशी देण्यात आली, तर शिवलिंगप्पालाही ब्रिटिशांनी अटक केली. राणी चेन्नम्मा यांच्या शौर्याची आठवण आजही कर्नाटकात जपली जाते. कित्तूर येथे दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात 'कित्तूर उत्सव' साजरा केला जातो. या उत्सवातून त्यांच्या पराक्रमाचे स्मरण केले जाते आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचा इतिहास पोहोचवला जातो. राणी चेन्नम्मा या केवळ कित्तूरच्या राणी नव्हत्या, तर भारतीय स्त्रीशक्तीचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे तेजस्वी प्रतीक होत्या. त्यांचे शौर्य आणि त्याग भारतीयांच्या स्मरणात सदैव जिवंत राहतील.

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# फुलांचा दसरा, पण शेतकऱ्याच्या आयुष्यात अंधारच!



दसऱ्याची सकाळ होती. बाजारपेठेत नेहमीपेक्षा अधिक गर्दी होती. दुकानांसमोर झेंडूच्या फुलांच्या माळा लटकल्या होत्या. कुणी वाहनाला हार घालत होते, कुणी पूजेसाठी फुले निवडत होते, तर कुणी घराच्या दाराला तोरण बांधण्यासाठी घासाघीस करत होते. बाजारात उत्साह होता, चेहऱ्यांवर आनंद होता आणि प्रत्येकाला सणाची घाई होती. याच गर्दीत रस्त्याच्या कडेला पोत्यांमधून झेंडूची फुले विक्रीसाठी मांडून बसलेले शेतकरीही होते. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र सणाचा उत्साह कमी आणि अपेक्षेचे सावट अधिक दिसत होते. एखादा ग्राहक थांबला की त्यांची नजर आशेने त्याच्याकडे वळत होती. चार पैसे जास्त मिळतील, माल संपेल आणि घरी परतताना मुलांसाठी नवीन कपडे घेता येतील, अशी स्वप्ने कदाचित त्यांनी मनाशी जपली होती.

पण बाजारातील वास्तव वेगळेच होते. झेंडूचा भाव विचारला असता अवघा वीस रुपये प्रति किलो असल्याचे समजले. क्षणभर विश्वासच बसला नाही. ज्या फुलांशिवाय दसऱ्याची सजावट अपूर्ण वाटते, त्याच फुलांना पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या पदरी इतका कमी भाव पडत होता! एका कप चहासाठी आपण सहज दहा रुपये मोजतो. चहा पिऊन काही मिनिटांत पुढे निघून जातो; पण या फुलांसाठी शेतकऱ्याने जवळपास तीन महिने घाम गाळलेला असतो. जमीन तयार करणे, रोपे लावणे, पाणी देणे, खते-औषधे टाकणे, फुलांची निगा राखणे आणि अखेर पहाटेपासून फुले तोडून बाजारात आणणे या प्रत्येक टप्प्या-मागे श्रम आणि खर्च असतो. तरीही त्या श्रमांचे मोल ठरवताना बाजार इतका निष्ठुर का होतो?

वीस क्विंटल फुले आणि शेतकऱ्यांचा हरवलेला दसरा आपणास दिसतो. बाजारात एका शेतकऱ्याजवळ थांबलो. त्याच्या समोर फुलांचा ढीग होता. काही फुले ताजी होती, तर काही हाताळणीमुळे चुरगळू लागली होती. मी सहज विचारले, मामा, किती फुले आणली होती? तो म्हणाला, साहेब, वीस क्विंटल झेंडू झाला. फुले तोडण्यासाठी पाच हजार रुपये मजुरी दिली आणि बाजारात आणण्यासाठी आणखी पाच हजार रुपये खर्च झाले. वीस रुपये किलोने सगळा माल विकला असता, तर चाळीस हजार रुपये मिळाले असते. पण ग्राहकच नाहीत. फक्त दहा हजार रुपयांची फुले विकली. उरलेली कोण घेणार? आता ती परत नेऊन काय करायचे? शेवटी रस्त्यावर टाकावी लागली. त्याचे बोलणे ऐकून मी निरुत्तर झालो. वीस क्विंटल म्हणजे दोन हजार किलो. सर्व माल विकला असता, तर चाळीस हजार रुपये मिळाले असते; प्रत्यक्षात मात्र दहा हजार रुपयांचीच विक्री झाली. फुले तोडण्याचा आणि वाहतुकीचा खर्चही तेवढाच. बियाणे, रोपे, खते, औषधे आणि पाण्याचा खर्च अजून बाकीच होता.

त्याच्या चेहऱ्याकडे पाहताना मनात विचार आला घरी त्याची मुले कदाचित नवीन कपड्यांची वाट पाहत असतील. पत्नीनेही सणासाठी काही खरेदी करण्याची आशा ठेवली असेल. सकाळी घरातून निघताना या माणस-ानेही फुलांच्या विक्रीतून काही पैसे मिळतील, असा हिशेब केला असेल. पण बाजारा-तील मंदीने त्याचे गणितच बिघडवले होते. डोळ्यांतली निराशा लपवण्याचा प्रयत्न करत तो म्हणाला, कशाचा दसरा आणि कशाचे कपडे? आमच्या नशिबी फक्त गरिबीच! हे शब्द ऐकताना बाजारातील गोंगाट क्षणभर बोचरा वाटू लागला. एका बाजूला लोक फुलांच्या माळा खरेदी करत होते; दुसऱ्या बाजूला तीच फुले पिकवणारा शेतकरी आपल्या कष्टांचा खर्चही भरून काढू शकत नव्हता.

या प्रसंगाने भास्कर चंदनशिव यांच्या 'अंगार माती' या कथासंग्रहातील 'लाल चिखल' या कथेची आठवण करून दिली. ग्रामीण जीवनाशी नाते सांगणारे साहित्य वाचताना आपण शेतकऱ्यांच्या संघर्षाची, त्यांच्या जगण्यातील असुरक्षिततेची आणि मातीशी जोडलेल्या नात्याची जाणीव करून घेतो. पण साहित्यामधून जाणवलेली वेदना जेव्हा दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष दिसते, तेव्हा तिची तीव्रता अधिक जाणवते. त्या शेतकऱ्याच्या समोर पडलेल्या फुलांकडे पाहताना मातीशी जोडलेल्या जगण्याचा अर्थ नव्याने समजत होता. शेतकऱ्यासाठी माती ही केवळ उत्पादनाचे साधन नसते; ती त्याच्या कुटुंबाच्या जगण्याचा आधार असते. पिकाची वाढ होताना त्याच्या आशाही वाढत असतात. फुलांना बहर आला की यंदा काहीतरी चांगले होईल, अशी अपेक्षा निर्माण होते. पण बाजारात भाव मिळाला नाही, तर त्या आशांचे रूपांतर क्षणात निराशेत होते.

'लाल चिखल'ची आठवण या अर्थाने महत्त्वाची वाटते की ग्रामीण जीवनातील वेदना केवळ कथेत बंदिस्त नसते. ती आपल्या आसपासच्या माणसांच्या जगण्यातही दिसते. साहित्य आपल्याला त्या वेदनेकडे पाहण्याची दृष्टी देते; दैनंदिन अनुभव तिची जाणीव अधिक खोल करतात. संध्याकाळी पुन्हा बाजारपेठेतून जाताना सकाळच्या ठिकाणीच रस्त्याच्या कडेला झेंडूची फुले पडलेली दिसली. काही फुले वाहनांच्या चाकांखाली चुरगळली होती, तर काही धुळीत मिसळली होती. सकाळी आशेने बाजारात आणलेला माल आता निरुपयोगी ठरला होता.

ती फुले पाहताना सहज विचार आला. आपण घरासाठी फुले घेताना त्यांच्या रंगाकडे पाहतो, ताजेपणा पाहतो आणि किंमत कमी करण्यासाठी घासाघीस करतो. पण त्या फुलांच्या मागे असलेली मेहनत किती जणांच्या लक्षात येते? फुले तोडणाऱ्या हातांचा, बाजारात पोहोचवण्यासाठी खर्च झालेल्या पैशांचा आणि त्यातून कुटुंबाच्या गरजा भागवण्याच्या अपेक्षांचा आपण विचार करतो का? शेतमालाची नासाडी म्हणजे केवळ काही किलो फुले वाया जाणे नव्हे. त्यात शेतकऱ्याचा वेळ, श्रम, पैसा आणि पाणी यांचाही अपव्यय होतो. नाशवंत मालाला वेळेत बाजारपेठ मिळाली नाही, तर त्याचे नुकसान थेट उत्पादकाला सहन करावे लागते. याच वास्तवामुळे उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी ही जुनी म्हणही विचार करायला लावते. शेतीला सर्वोच्च स्थान देणाऱ्या समाजात शेतकऱ्यालाच आपल्या कष्टांचा मोबदला मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर या गौरवाचा उपयोग काय? त्यामुळे आज शेतकऱ्याच्या जीवनात बदलाची गरज आहे.

फुलांना सणासुदीला मागणी वाढेल, या अपेक्षेने अनेक शेतकरी लागवड करतात. मात्र, एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर फुले बाजारात आली आणि ग्राहकांची संख्या कमी राहिली, तर भाव कोसळतात. फुलांसारखा नाशवंत माल साठवून ठेवण्याची मर्यादा असल्याने शेतकऱ्याला मिळेल त्या भावात विक्री करावी लागते किंवा माल फेकून द्यावा लागतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी लागवडीपूर्वी बाजारभाव आणि मागणीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या आणि बाजार समित्यांच्या मदतीने त्यांना ग्राहक, व्यापारी, मंदिर व्यवस्थापन व उत्सव आयोजकांशी थेट जोडता आले पाहिजे. फुलांची योग्य हाताळणी, तात्पुरती साठवणूक आणि माळा व सजावटीच्या वस्तू तयार करण्यासाठी प्रशिक्षण व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या उपायांनी सर्व समस्या लगेच सुटणार नाहीत; पण शेतकऱ्याला बाजारपेठेतील संधी वाढवता येतील. उत्पादन घेण्याची जबाबदारी शेतकऱ्याची असली, तरी त्याच्या मालाला रास्त भाव मिळण्यासाठी सक्षम व्यवस्था निर्माण करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

रावणाचे दहन करतो; मग अन्यायाचे काय? दसऱ्याला आपण रावणाचे दहन करून वाईटावर चांगल्याच्या विजयाचा उत्सव साजरा करतो. पण कष्ट करणाऱ्या माणसाला त्याच्या श्रमांचे योग्य मूल्य मिळत नसेल, तर त्या अन्यायाकडेही आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. भास्कर चंदनशिव यांच्या 'लाल चिखल'ची आठवण करून देणारे हे वास्तव आपल्याला ग्रामीण जीवनातील संघर्ष समजून घेण्यास प्रवृत्त करते. साहित्याने जागवलेली संवेदनशीलता दैनंदिन जीवनातही जपली पाहिजे. शेतकऱ्याच्या कष्टांचा गौरव केवळ भाषणांत न करता त्याला योग्य मोबदला मिळेल, यासाठी कृती झाली पाहिजे. रावणाचे पुतळे जाळून अन्याय संपत नाही. अन्याय निर्माण करणाऱ्या परिस्थितीत बदल घडवून आणला, तरच दसऱ्याच्या संदेशाला खरा अर्थ प्राप्त होईल. त्या दिवशी बाजारात भेटलेल्या शेतकऱ्याचे शब्द आणि संध्याकाळी रस्त्यावर पडलेली फुले मनात रेंगाळत राहिली. एका बाजूला आपल्या घरांची सजावट करण्यासाठी आपण फुले खरेदी करत होतो; दुसऱ्या बाजूला तीच फुले पिकवणारा माणूस आपल्या मुलांसाठी कपडे घेऊ शकत नव्हता. ही विसंगती केवळ एका शेतकऱ्याची वेदना नाही, तर आपल्या कृषिव्यवस्थेतील आर्थिक असुरक्षिततेचे चित्र आहे.

रस्त्यावर पडलेल्या त्या झेंडूच्या फुलांनी जणू समाजाला एक प्रश्न विचारला होता. माझ्या रंगाने तुमचा सण सजला; पण माझ्या शेतकऱ्याच्या आयुष्यात आनंदाचे रंग कधी भरणार? या प्रश्नाचे उत्तर शासन, बाजारव्यवस्था आणि समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या कृतीतून द्यायला हवे. शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळाला, त्याच्या श्रमांना प्रतिष्ठा मिळाली आणि त्याच्या मुलांच्या चेहऱ्यावरही सणाचा आनंद फुलला, तरच दसऱ्याच्या विजयाला खरा अर्थ प्राप्त होईल. शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळो आणि त्याच्या घरातही आनंदाचा दसरा उजाडो, हीच अपेक्षा!

**-प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार**
नांदेड

# भेसळीचा विळखा; जनतेच्या जीवाशी खेळ कधी थांबणार?



अन्न हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून निरोगी जीवनाचा आधार आहे. मात्र, आज याच अन्नामध्ये होणारी भेसळ हा समाजापुढील गंभीर प्रश्न बनला आहे. दूध, तूप, खाद्यतेल, मसाले, मिठाई, फळे आणि भाजीपाला अशा दैनंदिन वापरातील अनेक पदार्थांच्या शुद्धतेबाबत नागरिकांच्या मनात शंका निर्माण होत आहे. अधिक नफा कमावण्याच्या हव्यासापोटी काही अपप्रवृत्तींकडून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असेल, तर ही केवळ आर्थिक फसवणूक नसून मानवी जीवनाशी केलेली क्रूर प्रतारणा आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात सर्वसामान्य नागरिक बाजारातून अन्नपदार्थ खरेदी करतो, तेव्हा ते शुद्ध आणि सुरक्षित असतील, अशी त्याची रास्त अपेक्षा असते. मात्र, या विश्वासालाच तडा जात असेल, तर ग्राहकांनी कोणावर विश्वास ठेवायचा? आकर्षक पॅकिंग, मोठमोठ्या जाहिराती आणि स्वस्त दरांच्या आमिषामागे पदार्थांची गुणवत्ता लपलेली असू शकते. विशेषतः सणासुदीच्या काळात मिठाई, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढते. याच संधीचा गैरफायदा घेऊन काही विक्रेते भेसळयुक्त पदार्थ बाजारात आणण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो आणि प्रामाणिक व्यावसायिकांचीही बदनामी होते. भेसळीचा प्रश्न केवळ अन्नपदार्थांपुरता मर्यादित नाही. औषधांच्या गुणवत्तेबाबत गैरप्रकार, बनावट सौंदर्यप्रसाधने, निकृष्ट दर्जाच्या वस्तू आणि खोट्या बँडच्या उत्पादनांचाही प्रश्न गंभीर आहे. ग्राहकाने एखादी वस्तू विश्वासाने विकत घेतल्यानंतर ती बनावट किंवा निकृष्ट असल्याचे समोर येणे, ही ग्राहकांची फसवणूकच आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी केवळ नियम करून चालणार नाही, तर त्यांची कठोर आणि नियमित अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

भेसळ रोखण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची नाही, तर संपूर्ण व्यवस्थेची आहे. अन्न व औषध प्रशासनाने नियमित तपासण्या करणे, संशयास्पद नमुन्यांची प्रयोगशाळेत चाचणी करणे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. कारवाई केवळ छापे टाकण्यापुरती किंवा काही दिवसांच्या मोहिमेपुरती मर्यादित राहता कामा नये. भेसळ करणाऱ्यांना कायद्याचा धाक वाटला पाहिजे. दंडात्मक कारवाईसोबतच दोषींच्या विरोधात कायदेशीर प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली पाहिजे. त्याचबरोबर तपासणी यंत्रणां-मध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, ग्राहकांनीही जागरूक राहणे आवश्यक आहे. वस्तूंची खरेदी करताना उत्पादनाची तारीख, कालबाह्यता

तारीख, पॅकिंग, उत्पादकाची माहिती आणि आवश्यक गुणवत्ता चिन्हे तपासली पाहिजेत. संशयास्पद पदार्थ आढळल्यास संबंधित यंत्रणेकडे तक्रार नोंदवली पाहिजे. केवळ स्वस्त दराच्या मोहापायी आरोग्य धोक्यात घालणे टाळले पाहिजे. मात्र, ग्राहकांवरच संपूर्ण जबाबदारी ढकलून प्रशासन आणि उत्पादकांना मोकळीक देता येणार नाही. सुरक्षित अन्न मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अपेक्षेचा विषय आहे आणि त्यासाठी सक्षम यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीही जनजागृतीमध्ये पुढाकार घेतला पाहिजे. अन्नपदार्थांची सुरक्षितता, भेसळीची प्राथमिक लक्षणे आणि तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत नागरिकांना माहिती दिली पाहिजे. व्यापारी संघटनांनी आपल्या सदस्यांमध्ये नैतिक व्यवसायाची जाणीव निर्माण केली पाहिजे. व्यवसायात नफा मिळवणे गैर नाही; मात्र तो नफा दुसऱ्याच्या आरोग्याची किंमत मोजून मिळवणे निश्चितच अयोग्य आहे.

आज समाजाला विकासाबरोबरच विश्वासाचीही गरज आहे. बाजारात मिळणारा प्रत्येक पदार्थ सुरक्षित असेल, औषध प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण असेल, तसेच ग्राहकाची फसवणूक होणार नाही याची खात्री निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी, नियमित तपासणी, पारदर्शक कारभार आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या चार गोष्टी अत्यावश्यक आहेत.

भेसळखोरांविरोधातील लढा हा केवळ प्रशास-नाचा विषय नाही; तो प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याचा आणि सुरक्षित भविष्याचा प्रश्न आहे. पैशाच्या हव्यासापोटी माणसाच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. जनतेला शुद्ध अन्न, सुरक्षित औषधे आणि दर्जेदार वस्तू मिळणे ही उपकाराची बाब नसून ग्राहकांच्या हिताशी संबंधित अत्यंत महत्त्वा-ची जबाबदारी आहे. भेसळीचा विळखा तोडण्यासाठी आता केवळ आश्वासनांची नव्हे, तर कठोर कारवाईची गरज आहे. कारण, नफ्यापेक्षा माणसाचा जीव मोठा आणि पैशापेक्षा जन-तेचे आरोग्य अनमोल आहे! अन्नभेसळ हा केवळ कायद्याच्या अंमलबजावणीचा विषय नाही, तर तो जनतेच्या आरोग्याशी आणि जीवनाशी निगडित गंभीर प्रश्न आहे. पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी माणसाच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालणे ही काळाची गरज आहे. नागरिकांना आपण खात असलेला प्रत्येक घास सुरक्षित आहे, याची खात्री मिळाली पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने केवळ घटना घडल्यानंतर जागे होण्याऐवजी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला पाहिजे. भेसळखोरांवर कारवाई करण्याची घोषणा करून चालणार नाही, तर ती प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजे. अन्नभेसळीमुळे एखाद्याच्या आरोग्याची हानी झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा भेसळ होऊच नये, अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

शुद्ध अन्न हा उपकार नाही, तर प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. हा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी शासन आणि प्रशासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. अन्यथा, भेसळीचा विळखा अधिक घट्ट होत राहील आणि सामान्य माणसाच्या ताटातील अन्नच त्याच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरेल. आता वेळ आली आहे ती केवळ आश्वासनांची नव्हे, तर कठोर आणि परिणामकारक कृतीची! जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या भेसळखोरांना आळा बसणार तरी कधी? हा प्रश्न अनुत्तरित राहता कामा नये.

**-प्रा. संजय बडे**
दहेगाव ता. वैजापूर, जि. छ. संभाजी नगर
मो. ७८८८२९७८५९

# कर्जमुक्ती योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १ लाख २ हजार २१८ शेतकऱ्यांना ८६१.५६ कोटींचा लाभ

## तीन याद्यांमध्ये १ लाख ९७ हजार ९१२ शेतकरी पात्र; १ लाख ४१ हजार ८३५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

**नांदेड (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया संगणकीय प्रणालीद्वारे सुरू आहे. आतापर्यंत शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या तीन याद्यांमध्ये जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ९१२ शेतकरी पात्र ठरले असून, त्यापैकी १ लाख ४१ हजार ८३५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १ लाख २ हजार २१८ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ८६१.५६ कोटी रुपये इतकी कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

शासनाच्या दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे. योजनेत अल्प, अत्यल्प किंवा बहुभूधारक असा भेदभाव न करता पात्र वैयक्तिक शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे. कुटुंबाऐवजी वैयक्तिक शेतकरी हा लाभाचा घटक मानण्यात आला आहे.

योजनेअंतर्गत दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीककर्ज तसेच या कालावधीत पुनर्गठित झालेले अल्पमुदतीचे पीककर्ज दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असून, दि. ३१ मार्च २०२६ रोजीपर्यंत परतफेड झालेले नसल्यास, संबंधित पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज बाकी आहे, त्यांच्यासाठी एकरकमी परतफेड योजना लागू आहे. अशा शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांवरील थकीत रक्कम दि. ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास त्यांना राज्य शासनाकडून २ लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येणार आहे.

तसेच सन २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन वर्षांपैकी किमान दोन वर्षांत पीककर्ज घेऊन त्याची मुदतीत परतफेड केलेल्या आणि सन २०२५–२६ मध्ये पीककर्ज घेऊन त्याचीही मुदतीत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी संगणकीय प्रणालीद्वारे होत असून, कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना भविष्यात पुन्हा कर्ज घेण्यास पात्रता राहणार आहे.

योजनेच्या पोर्टलवर नांदेड जिल्ह्यातील बँकांनी एकूण २ लाख २४ हजार ८४७ थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटीमार्फत संगणकीय प्रक्रियेनंतर पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची विशिष्ट क्रमांकासह पहिली यादी दि. २५ जुलै २०२६, दुसरी यादी दि. ११ सप्टेंबर २०२६ आणि तिसरी यादी दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

यापुढेही पात्र लाभार्थ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने जाहीर होणार असून, आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर नियमानुसार कर्जमुक्तीची रक्कम टप्प्याटप्प्याने जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप यादीत नाव आलेले नसल्याने शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये अथवा कोणताही अनुचित निर्णय घेऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

यादीत नाव समाविष्ट न झालेल्या किंवा योजनेच्या लाभाबाबत शंका असलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित बँकेशी संपर्क साधावा. तसेच तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीकडे किंवा तालुका सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून...

**किनवट बाजार...**

ठरावाच्या बाजूने, तर गजानन मुंडे यांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. या प्रक्रियेनंतर सभापती मुंडे यांच्या विरुद्धचा अविश्वास ठराव मंजूर झाल्याची घोषणा पीठासन अधिकाऱ्यांनी केली. सभेच्या कामकाजात नायब तहसीलदार बालाजी फोले आणि सहायक महसूल अधिकारी दिलीप भुरे यांनी सहकार्य केले. सहायक निबंधक दीपक गायकवाड यांनी सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. या विशेष सभेला संचालक राहुल नाईक, अनिल पाटील कऱ्हाळे, सोपानराव केंद्रे, श्रीराम कांदे, सुनील घुगे, कैलाश बिज्जमवार, प्रेमसिंग साबळे, प्रेम जाधव, बालाजी बामणे, शेख हैदर शेख मुसा, राजू सुरोशे, प्रल्हाद सातव, नवीन राठोड, अब्दुल सत्तार, विद्या दासरवार, अनुसया पेंदोर आणि कुसुम मुंडे आदी संचालक उपस्थित होते.

अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर आता बाजार समितीच्या पुढील नेतृत्त्वाबाबत आणि प्रशासकीय कार्यवाहीबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे व्यापारी, शेतकरी आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात दोन ठिकाणी घरफोडी व चोरी; अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल




**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या असून, तामसा आणि शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११.३० ते दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान भोकर रोड, तामसा, ता. हदगाव येथे फिर्यादी व साक्षीदार यांच्या किराणा दुकानाच्या पाठीमागील पत्रा कापून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण ४६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या प्रकरणी फिर्यादी महेंद्र नरेंद्र लाभशेटवार (वय २७, रा. तामसा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२०/२०२६, कलम ३३१(४), ३०५(अ) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस हवालदार नागरगोजे करीत आहेत.

**शिवाजीनगरमध्ये मंदिरातून चांदीच्या ऐवजाची चोरी**

दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास स्वामी समर्थ सेवा केंद्र, मगनपुरा, नांदेड येथील गाभाऱ्यातील २८ हजार रुपये किमतीचा चांदीचा ऐवज अज्ञात महिला चोरटीने चोरून नेला.

या प्रकरणी फिर्यादी महेंद्र गोविंदराव गाढे (वय ४७, रा. मगनपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५२/२०२६, कलम ३०५(ड) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक सय्यद करत आहेत.

## शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्रीपाद पटवेकर

**भोकर (प्रतिनिधी)–** पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नूतन भोकर येथे शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यासाठी आयोजित पालक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



शालेय व्यवस्थापन समितीच्या नवनियुक्त अध्यक्षपदी श्रीपाद त्र्यंबकराव पटवेकर, तर उपाध्यक्षपदी श्रीमती सुजाता सुरेशकुमार दवणे यांची निवड करण्यात आली.

समितीच्या सदस्यपदी ज्योती रामदास सोनवडे, शारदा गजानन मस्के, प्रणिता बाबुराव सोनकांबळे, रुबीना बेगम शेख अन्सार, वैशाली भाऊराव तरटे यांच्यासह अन्य काहींची निवड करण्यात आली.

# कै. मुंजाजी पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात क्रीडा गौरव सोहळा संपन्न

## ८६ गुणवंत खेळाडूंचा पालकांसह सत्कार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** कै. मुंजाजी पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, मालेगाव येथे सोमवार, दि. १९ रोजी विविध क्षेत्रात तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरावर प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीहरी खुर्दामोजे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कै. मुंजाजी पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आ. संजय पाटील इंगोले उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य अनुराधा कदम, पालक प्रतिनिधी शिवाजी इंगोले, वीरभद्र दंडे, नारायण अन्नपूर्वे, राजू चव्हाण, मल्लिकार्जुन जनकवाडे, आझादे आदी मान्यवर उपस्थित होते.

खो – खो, व्हॅली बॉल, क्रिकेट, धावणे, बॅटमेंटन, गोळा फेक, भाला फेक, कबड्डी, बुद्धिबळ, चालणे या वर्षात विविध क्रीडा प्रकारातून एकूण ८६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून, त्यांचा पालकांसमवेत शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यामध्ये विभागस्तरीय भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरासाठी निवड झालेला विद्यार्थी शिवम शिवाजी इंगोले व जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विजय मिळवून विभागस्तरावर खेळलेली विद्यार्थिनी अक्षरा अन्नपूर्वे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा मार्गदर्शक प्रा. शुद्धोधन हटकर, उपप्राचार्य अनुराधा कदम, डॉ. विजयमाला ढोले, प्रा. सुदर्शन फाजगे, प्रा. नेहा अंडगे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सचिव संजय पाटील इंगोले यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. पालक प्रतिनिधी म्हणून शिवाजी इंगोले तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून मनीषा इंगोले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेसाब शेख यांनी केले, प्रास्ताविक प्रा. शुद्धोधन हटकर यांनी केले, तर आभार प्राचार्य श्रीहरी खुर्दामोजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नायगाव येथे 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' कार्यशाळा व आढावा बैठक संपन्न

## राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसह व्यापक जनजागृतीवर भर

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'सुदृढ आरोग्य सशक्त गाव समृद्ध भारत' या संकल्पनेतून नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नायगाव येथे तालुकास्तरीय 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' कार्यशाळा व आढावा बैठक उत्साहात पार पडली. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले.

या कार्यशाळेस अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखडे, सहायक गटविकास अधिकारी ऋषिकेश पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर आणि निरीक्षण व मूल्यमापन अधिकारी अनिल कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखडे यांनी मार्गदर्शन करताना, आरोग्य यंत्रणेने गावांतील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून नागरिकांना वेळेत आणि तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे सांगितले. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न बनविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांनी तालुक्यातील सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा उपकेंद्रनिहाय आणि कर्मचारीनिहाय सविस्तर आढावा घेतला. आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी, असे निर्देश त्यांनी दिले. क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक मार्गदर्शनही करण्यात आले.

निरीक्षण व मूल्यमापन अधिकारी अनिल कांबळे यांनी वार्षिक उद्दिष्टपूर्तीचा आढावा सादर केला. आरोग्यविषयक कामकाजात गुणवत्तापूर्ण सुधारणा करून निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस मांजरम येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रद्युम्न पाटील, कुंटूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. रेखा शिंदे, डॉ. सुनील वाघमारे, आरोग्य विस्तार अधिकारी महेश मुखेडकर, आरोग्य निरीक्षक अंकुश खिल्लारे यांच्यासह मांजरम, कुंटूर व बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहायक, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एमजीएम कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे युवक महोत्सव ज्ञानतीर्थ–२०२६ मध्ये यश; सहा पारितोषिकांची कमाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित युवक महोत्सव ज्ञानतीर्थ–२०२६ मध्ये महात्मा गांधी मिशनच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आयटी, नांदेड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सहा पारितोषिके पटकावली. विविध सांस्कृतिक कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या युवक महोत्सवात एकांकिका (पात्र:- श्रेयश कुलकर्णी, पुनीत मुंडे, मधुरा देशपांडे, वैष्णवी तुंगनवार, जयपाल उमरजकर, ऋषिकेश वाघमारे, अदिती लोड, अंजली जाधव, जान्हवी कदम व प्रकाश योजना यश उबाळे), मूकअभिनय कला प्रकारात (पात्र:- अंजली जाधव, श्रेयश कुलकर्णी, जयपाल उमरजकर,ऋषिकेश वाघमारे,वेदांत शर्मा,पवन शिंदे) आणि विडंबन(पात्र:- अंजली जाधव, श्रेयश कुलकर्णी, जयपाल उमरजकर, जान्हवी कदम, वैष्णवी तुंगणवार, प्रणया डाकोरे) या तीन कलाप्रकारांत प्रथम पारितोषिक मिळवून विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले.

# यशवंत महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–**यशवंत महाविद्यालय ग्रंथालयातील सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व नागरिकांकरिता यशवंत महाविद्यालय ग्रंथालय, नांदेड यांचेकडून डॉ. राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.



यानिमित्ताने तीन दिवस दि.१५ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० वा. ते सायंकाळी ०५ वा. ग्रंथालय सभागृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये दाखल नवीन ग्रंथ(Newly Arrived Books in the cademic Year 2026- 27) या विषयावर राज्य पातळीवरील तीन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन उपलब्ध व उपयुक्त नवीन ग्रंथांची माहिती व्हावी याकरिता ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी व उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य तथा माजी प्रकुलगुरू स्वा. रा. ती. म. वि. नांदेड, डॉ. जी. एन. शिंदे हे होते.

उद्घाटनप्रसंगी डॉ. जी. एन. शिंदे यांनी सांगितले की, महाविद्यालय ग्रंथालयामार्फत हे सर्व नवीन ग्रंथ व वाचनसाहित्याची विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमासाठी पुरक असे ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्याचा त्यांनी शैक्षणिक विकास व स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळविण्यासाठी पुरेपूर उपयोग करून फायदा घ्यावा. याच बरोबरीने ग्रंथालय वाचन कक्ष व ई–संसाधने (ई–रिसोर्सेस) याचाही जास्तीत जास्त उपयोग करून स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवावे. तर सुरुवातीस कार्यक्रमाचे समन्वयक ग्रंथपाल डॉ. कैलास ना. वडजे यांनी प्रास्ताविक केले.

या ग्रंथ प्रदर्शनात विद्यार्थ्यांना, शिक्षकांना शैक्षणिक व विविध स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असणारा ग्रंथसंग्रह, ई–वाचनसाहित्य, नियतकालिके, संशोधन पत्रिका व अहवाल आदी उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच सर्व भाषा व साहित्यातील नवीन उपयुक्त ग्रंथसंग्रहाची मांडणी या प्रदर्शनात करण्यात आली होती, ज्यामध्ये विश्वकोश, शब्दकोश, सूची, व्याकरण, भाषेचा इतिहास व आढावा, समीक्षात्मक ग्रंथ व नामवंत लेखकांचे कथा, कादंबरी, कवितासंग्रह इत्यादींचा समावेश होता.

## सिद्धीविनायक मंदिर व साई–गणेश देवस्थानच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेडमध्ये ५ दिवस अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राधिकानगर परिसरातील श्री सिद्धीविनायक मंदिर व साई– गणेश देवस्थानचा ४१ वा वर्धापन दिन सोहळा यंदा मोठ्या उत्साहात पार पडत आहे. दिनांक २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या पाच दिवसीय महोत्सवात विविध धार्मिक व अध्यात्मिक अनुष्ठान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाची सुरुवात गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता श्री सिद्धीविनायक मंदिर (पाठक गल्ली, नांदेड) येथे अभिषेकाने होणार आहे. या पहिल्या दिवशी होणाऱ्या अभिषेकाचे यजमानपद श्री व सौ. ह्षिकेश गजाननराव नेरलकर आणि श्री व सौ. आशिष नेरलकर भूषविणार आहेत.

रोज सकाळी होणारी प्रवचन सत्रे 'श्री साई गणेश देवस्थान, राधिका नगर, नांदेड' येथे सकाळी ८:३० ते ९:३० या वेळेत पार पडतील. यामध्ये अनुक्रमे ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठकर (३० ऑक्टोबर), ह.भ.प. बा. ल. चोथवे महाराज (३१ ऑक्टोबर), आणि ह.भ.प. बाबु महाराज काकांडीकर (१ नोव्हेंबर) यांची प्रवचनसेवा लाभणार आहे.

सायंकाळच्या सत्रातील हरिनाम कीर्तन सोहळे अशोकनगर हनुमान मंदिर, अशोकनगर, नांदेड येथे संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत संपन्न होणार आहेत. यात ह.भ.प. लक्ष्मीप्रसाद पटवारी, ह.भ.प. प्रभंजनबुवा भगत (शिर्डी), ह.भ.प. शंकरबुवा आजेगांवकर (परभणी) आणि प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. डॉ. चारुदत्त बुवा आफळे (पुणे) यांचे कीर्तन होणार आहे.

# रामतीर्थ परिसरातील श्री शिवलिंगअप्पा व श्री भवानी मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील रामतीर्थ परिसरातील पुरातन व हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री शिवलिंगअप्पा मंदिर आणि श्री भवानी माता मंदिराचा जीर्णोद्धार ग्रामस्थांच्या पुढाकारातून करण्यात आला. या दोन्ही मंदिरांचा कलशारोहण सोहळा विजयादशमीच्या मुहूर्तावर रविवार, २० ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजता श्री गुरु १०८ ष.ब्र. सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यास लोकप्रतिनिधी, विविध गावांतील पदाधिकारी आणि परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

या सोहळ्यास नांदेड लोकसभेचे खासदार रवींद्र पाटील चव्हाण, बिलोली–देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापूरकर, उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष कैलास गोरठेकर, किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने, चिटमोगरा येथील सरपंच आकाश कोकणे, तिरुपती डाकोरे, सरपंच प्रतिनिधी हणमंतराव पाटील तोडे, बाबाराव पाटील रोकडे, संतोष पाटील, मुरलीधर पाटील देगलुरे, दिलीप पाटील कानोले, अनुप पाटील डोणगावकर, ब्रह्मा कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय परिसरातील विविध गावांचे सरपंच, पोलीस पाटील, चेअरमन आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कलशारोहण सोहळ्याप्रसंगी आमदार जितेश अंतापूरकर यांनी मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. मंदिराला सध्या असलेला 'क' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा वाढवून 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच मंदिर परिसराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले.

## रत्नागिरी येथे रणजी क्रिकेटपटू सुनील जाधव आणि सुनील यादव यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)–** रत्नागिरी येथे सुरू असलेल्या १९ वर्षांखालील (ण–१९) राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेच्या औचित्याने क्रिकेट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल नांदेडचे भूमिपुत्र, रणजी क्रिकेटपटू सुनील गंगाधरराव जाधव आणि सुनील यादव यांचा रत्नागिरीचे जिल्हाधिकारी जिंदल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुनील जाधव यांनी अत्यंत कमी वयात रणजी क्रिकेट खेळण्याचा मान मिळवला असून, त्यांनी आपल्या पदार्पणाचा सामना रत्नागिरी येथेच खेळला होता. त्यांच्या या क्रिकेट प्रवासातील अनुभव आणि योगदानाचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. तसेच महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सुनील यादव यांच्याही उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांचाही सन्मान करण्यात आला.

या सत्कारामुळे स्पर्धेत सहभागी झालेल्या नवोदित क्रिकेटपटूंना मोठी प्रेरणा मिळाली आहे. कष्ट, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर क्रिकेट क्षेत्रात यश मिळवता येते, हेच या दोन्ही खेळाडूंच्या प्रवासातून दिसून येते. या सन्मानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आणि क्रीडाप्रेमींनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# टाकाऊ पिकांच्या अवशेषांपासून तयार करा सकस पशुखाद्य –डॉ. डी. टी. शिंदे

**हदगाव (प्रतिनिधी)–** सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि त्यातून चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने या समस्येवर उपाय म्हणून दुष्काळात टाकाऊ चाऱ्याचे सकस चाऱ्यात रूपांतर कसे करावे याविषयी डॉ. डी. टी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले.



दुष्काळी परिस्थितीत जनावरांना पौष्टिक चारा उपलब्ध व्हावा यासाठी पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय सहायक आयुक्त डॉ. डी. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी युरिया–गूळ प्रक्रियेद्वारे वाळलेल्या व निकृष्ट चाऱ्याची गुणवत्ता सुधारता येते. या प्रक्रियेमुळे चाऱ्याची पचनक्षमता वाढण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

ज्वारीचे कडबा, गव्हाचे काड, सोयाबीन, हरभरा व तूर यांचे अवशेष तसेच उसाच्या पाचटाचा योग्य वापर करून चारा टंचाईवर मात करता येते. प्रक्रिया केलेल्या चाऱ्यामुळे जनावरांना पोषण मिळण्यास मदत होते. परिणामी पशुपालकांचा पशुखाद्यावरील खर्च कमी होण्यास हातभार लागतो, असे सांगून शेतातील टाकाऊ पिकांचे अवशेष जाळून न टाकता त्यावर योग्य प्रक्रिया करून त्याचे सकस पशुखाद्यात रूपांतर करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

साधनसामग्रीचा योग्य वापर कसा करावा यासाठी काही अडचण आल्यास ९४२३८६३५४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क करण्याचे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले. यावेळी निवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी प्रकाश राठोड, पशुधन पर्यवेक्षक देवीकांत पतंगे यांची उपस्थिती होती.

CMYK

# अंतर्मन

## बद्रीनाथ धामचे दरवाजे 16 नोव्हेंबरला होणार बंद

### जाणून घ्या केदारनाथ, यमुनोत्री अन् गंगोत्रीची तारीख...



नोव्हेंबर महिन्यात चारधाम यात्रेची सांगता होणार आहे. शीतकालीन (हिवाळ्याच्या) कालावधीसाठी १६ नोव्हेंबरला बद्रीनाथ धामचे कपाट (दरवाजे) बंद होतील. याआधी १२ नोव्हेंबरपासून मंदिरात दरवाजे बंद करण्याशी संबंधित 'पंच पूजा' सुरू होईल. विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर श्री बद्रीनाथ धामचे कपाट बंद करण्याची तारीख जाहीर करण्यात आली. भाविकांसाठी बद्रीनाथ धामचे दर्शन घेण्याची या वर्षातील ही शेवटची संधी असणार आहे.

### पाच दिवस चालेल विशेष पूजा-अर्चा

- १२ नोव्हेंबर : श्री गणेश पूजन होईल.
- १३ नोव्हेंबर: आद्य केदारेश्वर मंदिर आणि आद्य गुरु शंकराचार्य मंदिराचे दरवाजे बंद होतील.
- १४ नोव्हेंबर : खड्ग पुस्तक पूजन होईल आणि वेद ऋचांचे वाचन थांबवले जाईल.
- १५ नोव्हेंबर : माता लक्ष्मीला कढईत तयार केलेल्या अन्नाचा भोग (नैवेद्य) दाखवून भगवान बद्रीविशाल यांच्या दरबारात येण्याचे निमंत्रण दिले जाईल.
- १६ नोव्हेंबर : माता लक्ष्मी श्री बद्रीनाथ मंदिराच्या गर्भगृहात प्रवेश करतील. भगवान कुबेर आणि उद्धवजी मंदिर परिसरात येतील. त्यानंतर रात्री ९:३७ वाजता बद्रीनाथ धामचे दरवाजे हिवाळ्यासाठी बंद केले जातील.

### दरवाजे बंद झाल्यावर देवाचे दर्शन कुठे घेता येईल?

दरवाजे बंद झाल्यानंतर भगवान बद्रीनाथ यांची पूजा त्यांच्या शीतकालीन निवासस्थानी सुरू राहील. १७ नोव्हेंबरला भगवान उद्धवजी आणि भगवान कुबेरजी 'योग बद्री पांडुकेश्वर'कडे प्रस्थान करतील. हिवाळ्यात येथेच उद्धवजी आणि कुबेरजींची पूजा केली जाईल. तसेच गरुडजी आणि आद्य गुरु शंकराचार्य यांची गादी (पालखी) जोशीमठ (ज्योतिर्मठ) येथील श्री नृसिंह मंदिराकडे रवाना होईल. १८ नोव्हेंबरला आद्य गुरु शंकराचार्य यांची गादी श्री नृसिंह मंदिरात विराजमान होईल. यासोबतच बद्रीनाथ धाम यात्रेचा निरोप घेतला जाईल.

### चारधामातील इतर मंदिरांचे दरवाजे कधी बंद होणार?

- २०२६ मधील चारधाम यात्रेतील उर्वरित प्रमुख धामांचे दरवाजे बंद होण्याच्या तारखाही निश्चित झाल्या आहेत.
- गंगोत्री धाम : १० नोव्हेंबर (मंगळवार - गोवर्धन पूजेच्या दिवशी)
- केदारनाथ धाम : ११ नोव्हेंबर (बुधवार - भाऊबीजेच्या दिवशी सकाळी ८:३० वाजता)
- यमुनोत्री धाम : ११ नोव्हेंबर (बुधवार - भाऊबीजेच्या दिवशी)
- बद्रीनाथ धाम : १६ नोव्हेंबर (सोमवार - रात्री ९:३७ वाजता)
- अशा प्रकारे नोव्हेंबर महिन्यात चारही धामांचे कपाट बंद झाल्यानंतर चारधाम यात्रा २०२६ ची सांगता होईल.

### विजयादशमीला झाली विशेष पूजा

विजयादशमीच्या दिवशी बद्रीनाथ मंदिर परिसरात नवरात्र आणि उर्वशी माता पूजेची हवन-यज्ञाने सांगता झाली. या वेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कपाट बंद करण्याची तारीख निश्चित करण्यापूर्वी धर्माधिकारी आणि वेदपाठी आचार्यांनी पूजा आणि पंचांग गणना केली. यानंतर बद्रीनाथ धामचे रावळ अमरनाथ नंबूदरी यांनी कपाट बंद होण्याच्या तारखेची अधिकृत घोषणा केली.

### हरिद्वारला जाणाऱ्या भाविकांसाठी मोठी बातमी

## 7 नोव्हेंबरपर्यंत गेल्यास 'हर की पौरी'त करता येणार नाही स्नान, जाणून घ्या संपूर्ण प्रकरण...

हरिद्वारला जाणाऱ्या भाविकांसाठी एक मोठी बातमी समोर येत आहे. सध्या 'हर की पौरी'वर गंगेची धारा वाहत नाहीये, त्यामुळे भाविकांना गंगेत डुबकी मारता येत नाहीये. मिळालेल्या माहितीनुसार, ७ नोव्हेंबरपर्यंत भाविकांना हरिद्वारमधील हर की पौरीवर गंगा स्नान करता येणार नाही. हे प्रकरण नेमके काय आहे आणि असे का केले गेले आहे, हे सविस्तर जाणून घेऊया...

हरिद्वारमध्ये पौर्णिमा, अमावस्या आणि शुभ प्रसंगी लोक हर की पौरीत डुबकी मारण्यासाठी जातात. शास्त्रातही गंगा स्नानाला विशेष महत्त्व असून ते अत्यंत पुण्यकारक मानले जाते. मात्र, सध्या हर की पौरीवर स्नान करण्यासाठी येणाऱ्यांना गंगेची धारा पाहायला मिळत नाहीये. वास्तविक, सध्या हर की पौरीवरील गंगेचे पाणी अडवण्यात आले असून, माहितीनुसार ७ नोव्हेंबर रोजी ते पुन्हा पूर्ववत सुरू केले जाईल. माहितीनुसार, २० ऑक्टोबर (मंगळवार)पासूनच हरिद्वारमधील हर की पौरी घाटावर गंगाजल येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. यामागे दोन मुख्य कारणे सांगितली जात आहेत. दरवर्षी हर की पौरीवर स्वच्छता करण्यासाठी गंगा नदीचे पाणी काही दिवसांसाठी रोखले जाते. त्यानुसार २० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर (शनिवार) या कालावधीत हर की पौरीवरील पाणी बंद ठेवले जाईल. त्यानंतरच भाविकांना पुन्हा गंगा स्नान करता येईल. त्यामुळे तुम्ही हरिद्वारला जाऊन स्नान करण्याचा बेत आखत असाल, तर काही दिवसांसाठी तो पुढे ढकलणे सोयीचे ठरेल. हर की पौरीवर पाणी रोखण्यामागचे आणखी एक कारण म्हणजे, पुढील वर्षी म्हणजेच २०२७ मध्ये हरिद्वारमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाणार आहे. यामुळे हर की पौरीवर दुरुस्ती आणि स्वच्छतेचे काम तसेच कुंभमेळ्याची तयारी सुरू आहे. ७ नोव्हेंबर रोजी हे पाणी पुन्हा सोडण्यात येईल. त्यानंतर भाविक नेहमीप्रमाणे हर की पौरीवर पुन्हा गंगा स्नान करू शकतील.

## कार्तिक महिना कधी सुरू होणार, कधी संपणार?

### जाणून घ्या योग्य तारखा अन् या महिन्यात पाळावयाचे महत्त्वाचे नियम...

हिंदू धर्मात कार्तिक मासाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या महिन्यात भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांच्या पूजेला विशेष महत्त्व दिले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, चातुर्मासातील दीर्घ निद्रेनंतर भगवान विष्णू याच काळात जागृत होतात. त्यामुळे कार्तिक महिन्यात स्नान, दान, दीपदान आणि पूजाअर्चा करणे अत्यंत शुभ मानले जाते. आश्विन महिन्यातील पौर्णिमेनंतर येणाऱ्या प्रतिपदेपासून कार्तिक मासाला सुरुवात होते. या महिन्यात काही धार्मिक विधी आणि नियमांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते. काही गोष्टी शुभ मानल्या जातात, तर काही गोष्टी टाळण्याचा सल्ला दिला जातो. पंचांगानुसार, कार्तिक मासाची सुरुवात आणि समाप्ती याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊया...



| तपशील | तारीख आणि वेळ |
|---|---|
| आश्विन पौर्णिमा तिथी समाप्त | २६ ऑक्टोबर, सकाळी ९:४२ |
| कार्तिक प्रतिपदा तिथी प्रारंभ | २६ ऑक्टोबर, सकाळी ९:४२ नंतर |
| कार्तिक प्रतिपदा तिथी समाप्त | २७ ऑक्टोबर, सकाळी ७:०२ |
| कार्तिक मासातील व्रत आणि मेळ्यांचा प्रारंभ | २७ ऑक्टोबर, मंगळवार |
| कार्तिक मासाची समाप्ती | २४ नोव्हेंबर, मंगळवार |

### कार्तिक मासात कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

- पंडित राकेश झा यांच्या माहितीनुसार, कार्तिक महिन्यात काही पदार्थांचे सेवन टाळण्याची धार्मिक परंपरा आहे. तसेच आचार-विचारांबाबत काही नियम पाळण्याचा सल्ला दिला जातो.
- वांग्याचे सेवन टाळावे : कार्तिक महिन्यात वांगे खाऊ नये, अशी काही धार्मिक मान्यता आहे. वांग्याच्या सेवनामुळे पचनावर परिणाम होतो, असेही लेखात नमूद करण्यात आले आहे. तसेच त्याचा संततीवर प्रतिकूल परिणाम होतो, अशी काही ठिकाणी श्रद्धा आहे. मात्र, या धार्मिक समजुतींना वैज्ञानिक आधार असल्याचे गृहीत धरू नये.
- काही पदार्थांचे सेवन करू नये : धार्मिक परंपरेनुसार, कार्तिक महिन्यात उडीद डाळ, मूग डाळ, मटार, मासे, लसूण आणि हरभरा यांसारखे काही पदार्थ टाळण्याचा सल्ला दिला जातो. या काळात मांसाहार आणि मद्यपानापासून दूर राहण्यावरही भर दिला जातो.
- शरीराला तेल लावण्याबाबत नियम : काही धार्मिक मान्यतांनुसार, कार्तिक महिन्यात शरीराला तेल लावणे टाळावे. मात्र, नरक चतुर्दशीच्या दिवशी, म्हणजेच कार्तिक कृष्ण चतुर्दशीला तेल लावण्याची परंपरा आहे.
- राग आणि वादविवाद टाळावेत : कार्तिक महिन्यात राग, भांडणे, वादविवाद आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो. मन शांत ठेवणे, इतरांशी चांगले वागणे आणि संयम पाळणे यांना महत्त्व दिले जाते.
- ब्रह्मचर्याचे पालन करावे : काही धार्मिक परंपरांमध्ये कार्तिक महिन्यात ब्रह्मचर्याचे पालन करण्यास सांगितले जाते. संयम, साधना आणि भक्ती यांवर भर देणे हा या परंपरेमागील उद्देश मानला जातो.

### प्रारंभ अन् समाप्तीच्या तारखा...

- पंचांगानुसार, सोमवार, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजून ४२ मिनिटांपर्यंत आश्विन पौर्णिमा तिथी असेल. त्यानंतर प्रतिपदा तिथी सुरू होईल आणि कार्तिक मासाला प्रारंभ होईल.
- मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजून २ मिनिटांपर्यंत प्रतिपदा तिथी असेल. उदयतिथीच्या गणनेनुसार, २७ ऑक्टोबरपासून कार्तिक महिन्यातील व्रत आणि धार्मिक मेळ्यांना सुरुवात होईल. कार्तिक पौर्णिमेला, म्हणजेच २४ नोव्हेंबर २०२६ रोजी या महिन्याची समाप्ती होईल. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी स्नान आणि दान करण्याला विशेष महत्त्व असल्याचे धार्मिक मान्यतांमध्ये सांगितले जाते.

### मासात कोणती कामे करावीत?

- दीपदान करावे : कार्तिक महिन्यात दीपदानाला विशेष महत्त्व आहे. धार्मिक मान्यतेनुसार, पवित्र नदी, तलाव किंवा घराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तुपाचा दिवा लावणे शुभ मानले जाते. विशेषतः संध्याकाळच्या वेळी दीपदान केल्याने भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची कृपा प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.
- जमिनीवर झोपण्याची परंपरा : कार्तिक महिन्यात जमिनीवर झोपण्याची परंपरा काही धार्मिक प्रथांमध्ये सांगितली जाते. यामुळे मनात सात्त्विकता आणि साधेपणा वाढतो, अशी श्रद्धा आहे. मात्र, थंडीचा त्रास होत असल्यास किंवा प्रकृती ठीक नसल्यास जमिनीवर झोपण्याचा आग्रह धरू नये. आवश्यकतेनुसार गादीचा वापर करावा.
- गरजू व्यक्तींना दान करावे : कार्तिक महिन्यात दानधर्माला विशेष महत्त्व दिले जाते. आपल्या क्षमतेनुसार गरजू व्यक्तींना तांदूळ किंवा इतर जीवनावश्यक वस्तू दान करता येतात. धार्मिक मान्यतेनुसार, तांदळाचे दान केल्याने चंद्राची अनुकूलता वाढते आणि चंद्रदोषाचा प्रभाव कमी होतो, अशी श्रद्धा आहे.
- गुळाचे सेवन आणि दान : या महिन्यात दररोज गुळाचे सेवन करणे शुभ मानले जाते. तसेच आपल्या क्षमतेनुसार गुळाचे दानही करता येते. यामुळे पुण्यलाभ होतो, अशी धार्मिक धारणा आहे.
- तुळशीची पूजा करावी : कार्तिक महिन्यात तुळशीच्या पूजेला विशेष महत्त्व आहे. धार्मिक परंपरेनुसार, सकाळी आणि संध्याकाळी तुळशीजवळ शुद्ध तुपाचा दिवा लावावा. तुळशीची नियमित पूजा केल्याने घरात सुख, समृद्धी आणि सकारात्मकता नांदते, अशी श्रद्धा आहे.



## शरीरावरील तीळ आणि मस्से देतात संकेत?

### कपाळावरील तिळाचा मान-सन्मान अन् आर्थिक लाभाशी काय संबंध...

**शरीराच्या विविध भागांवर असलेल्या तिळांचा आणि मस्स्यांचा संबंध व्यक्तीचे भाग्य, आर्थिक स्थिती, मान-सन्मान आणि जीवनातील घडामोडींशी जोडला जातो. हस्तरेखाशास्त्र आणि पारंपरिक सामुद्रिक शास्त्रातील समजुतीनुसार, शरीराच्या काही भागांवरील तीळ आणि मस्से शुभ मानले जातात. कपाळावरील तीळ हा मान-सन्मान आणि विविध मार्गांनी लाभ मिळण्याचे प्रतीक मानला जातो. शरीराच्या वेगवेगळ्या भागांवरील तिळांबाबत आणि मस्स्यांबाबत कोणत्या समजुती प्रचलित आहेत, हे जाणून घेऊया...**



### तीळ, मस्सा आणि लालसर खुणा यातील फरक काय?

शरीरावर दिसणारी काळसर किंवा तपकिरी रंगाची लहान खूण म्हणजे तीळ. काही तीळ त्वचेच्या पातळीवर असतात, तर काही किंचित उंचवट्यासारखे दिसतात. त्वचेवर उठून दिसणारी लहान गाठ म्हणजे सामान्यतः मस्सा असे म्हटले जाते. मात्र, त्वचेवरील प्रत्येक उंचवटा हा मस्साच असेल असे नाही. त्याचे स्वरूप आणि कारण वेगवेगळे असू शकते. शरीरावर काही व्यक्तींना लालसर रंगाच्या खुणाही दिसतात. अशा खुणांना पारंपरिक वर्णनांमध्ये विशिष्ट नावे दिलेली आढळतात. पारंपरिक समजुतीनुसार, तीळ किंवा मस्सा स्पष्टपणे दिसणारा आणि आकर्षक स्वरूपाचा असेल, तर त्याला शुभ मानले जाते. तथापि, या खुणांवरून व्यक्तीचे भविष्य किंवा भाग्य निश्चित होते, याला वैज्ञानिक आधार नाही.

### जन्मानंतर नवीन तीळ किंवा मस्से आल्यास...

- नाकावर मस्सा : नवीन वस्त्रे किंवा सुख-सुविधा मिळण्याचे प्रतीक मानले जाते.
- कानावर मस्सा : दागिने, अलंकार किंवा ज्ञानप्राप्तीशी त्याचा संबंध जोडला जातो.
- डोके आणि मान यांच्या जोडाजवळ मस्सा : संभाव्य दुखापतीचे संकेत मानून सावध राहण्याचा सल्ला दिला जातो.
- हातावर किंवा बोटांवर मस्सा : आर्थिक लाभ, धनप्राप्ती आणि सौभाग्याचे प्रतीक मानले जाते.
- या सर्व बाबी पारंपरिक श्रद्धा आणि समजुतींवर आधारित आहेत. शरीरावरील खुणांवरून भविष्यातील घटना, आर्थिक लाभ किंवा अपघात यांचे अचूक भाकीत करता येते, असा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही.

### तीळ आणि मस्से संबंधित शुभ-अशुभ समजुती

- कपाळावरील तीळ किंवा लालसर खूण : पारंपरिक सामुद्रिक शास्त्रानुसार, कपाळावर तीळ किंवा विशिष्ट प्रकारची खूण असणे शुभ मानले जाते. अशा व्यक्तींना समाजात मान-सन्मान मिळतो आणि त्यांच्या मेहनतीला चांगले फळ मिळते, अशी समजूत आहे.
- कपाळाच्या उजव्या आणि डाव्या बाजूला असलेला तीळ : कपाळाच्या उजव्या बाजूला तीळ असलेल्या व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या यश मिळते, असे मानले जाते. तर डाव्या बाजूला तीळ असल्यास अपेक्षित लाभ मिळवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागू शकतात, अशी पारंपरिक धारणा आहे. मात्र, प्रत्यक्षात आर्थिक यश हे कौशल्य, मेहनत, संधी आणि परिस्थितीवर अवलंबून असते.
- डोळ्यांजवळील तीळ : डोळ्यांवर किंवा त्यांच्या आसपास तीळ असलेल्या व्यक्तींना भविष्यात राजकारणात संधी मिळू शकते किंवा त्या मोठ्या पदावर पोहोचू शकतात, अशी समजूत काही पारंपरिक मान्यतांमध्ये आढळते.
- चेहऱ्यावरील तीळ : चेहऱ्यावरील तीळ स्पष्ट आणि आकर्षक असेल, तर व्यक्तीला स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर धन-संपत्ती मिळू शकते, असे पारंपरिक सामुद्रिक शास्त्रात मानले जाते. मात्र, केवळ तिळाच्या स्थानावरून व्यक्तीची आर्थिक स्थिती ठरवता येत नाही.
- डोक्याच्या मागील बाजूला असलेला मस्सा : डोक्याच्या मागील बाजूला मस्सा असणे शुभ मानले जाते. अशा व्यक्ती भाग्यवान असतात आणि त्यांच्या आयुष्यात चांगल्या संधी येतात, अशी पारंपरिक धारणा आहे.
- पापणीवरील मस्सा : पापणीवर मस्सा असणे काही पारंपरिक समजुतींमध्ये अशुभ मानले जाते. अशा व्यक्तींना आयुष्यात चढ-उतारांचा सामना करावा लागू शकतो, असे सांगितले जाते. मात्र, या समजुतीला वैज्ञानिक पुष्टी नाही.

# राष्ट्रवादीत मंत्रिमंडळ बदलाच्या जोरदार हालचाली!

## दिल्लीत अमित शाह, पार्थ पवार अन् सुनेत्रा पवारांच्या बैठकीत खलबतं

**मुंबई (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मंत्रिमंडळ बदलाच्या हालचालींची चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत काल (बुधवारी, ता २१) दिल्लीत बैठक पार पडली, राज्यातील राष्ट्रवादीच्या वाट्याचे अर्थखात मिळण्यासोबतच मंत्रिपदे बदलण्याची देखील राष्ट्रवादीच्या प्रमुखांकडून अमित शाहांकडे इच्छा व्यक्त केल्याची सूत्रांची माहिती आहे. तीन दिवसांपूर्वी अमित शाह यांची पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांनी भेट घेतल्यानंतर त्यानंतर लगेचच राज्याचे प्रमुख देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत अमित शाहांकडे बैठक पार पडली. अमित शाह यांच्या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घडणाऱ्या घडामोडींकडे विशेष लक्ष लागलं आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीमध्ये अमित शाह यांची भेट घेतली. बुधवारी या नेत्यांमध्ये बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादीच्या वाट्याला सुरूवातीला आलेलं अर्थ खातं मिळण्यासोबतच मंत्रिपद बदलण्याची देखील राष्ट्रवादीच्या प्रमुखांकडून अमित शहांकडे इच्छा व्यक्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांच्या हवाल्याने समोर आली आहे. तीन दिवसांपूर्वी पार्थ पवार, सुनेत्रा पवार यांनी अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर लगेचच देवेंद्र फडणवीस यांची आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांची अमित शाहांसोबत पुन्हा बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे, अमित शहा यांच्या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडणाऱ्या घडामोडींकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत बदलाचे वारे वाहू लागल्याची माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, तीन दिवसांपूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांची अमित शाहांसोबत महत्त्वाची बैठक पार पडली होती, राज्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेलं अर्थखातं आहे ते पुन्हा मिळालं पाहिजे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आणखी काही फेरबदलांचाही निर्णय या बैठकीत चर्चेत आल्याची माहिती आहे. या अनुषंगाने महत्त्वाची चर्चा गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झाल्याची माहिती एबीपी माझाला विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे.

बुधवारी देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गृहमंत्री अमित शाहांच्यासोबत एक बैठक पार पडली आहे, त्या बैठकीमध्ये राज्यातील घडामोडी संदर्भात आणि अर्थ खातं त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसने आपली भूमिका मांडली आहे, त्यानंतर आता राष्ट्रवादी पक्षात कोणते बदल होणार का? हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे, मात्र पक्षामध्ये अंतर्गत बदल होण्याची दाट शक्यता दिसून येत आहे, गेल्या काही दिवसांमध्ये पार्थ पवार यांनी पक्षाची कमान हाती घेतली आहे, त्यानंतर काही महत्त्वाचे निर्णय ते घेत आहेत, त्यामध्ये हा एक महत्त्वाचा निर्णय घेतला जाऊ शकतात अशी माहिती आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय

## संजू सॅमसन व नमन धीरची तुफानी फटकेबाजी

**क्राइस्टचर्च (न्यूझीलंड) (वृत्तसंस्था)**– न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात भारतीय फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडत शानदार विजय मिळवला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ४ बाद २२५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने १९.४ षटकांत ६ विकेट्स गमावत २३० धावा करत लक्ष्य गाठले. संजू सॅमसनच्या ६७ धावा आणि नमन धीरच्या नाबाद ४२ धावांच्या जोरावर भारताने हा सामना ४ विकेट्सने जिंकला. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.




भारताच्या विजयाचा पाया संजू सॅमसनने रचला. त्याने अवघ्या ३३ चेंडूंत ६७ धावा ठोकल्या. या खेळीत त्याने ८ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताला मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेग मिळाला. सलामीवीर अभिषेक शर्मानेही आक्रमक सुरुवात केली. त्याने केवळ १२ चेंडूंत २९ धावा केल्या. त्याच्या खेळीत २ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. मात्र, तिलक वर्माला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्याने ११ चेंडूंत ६ धावा केल्या.

मधल्या फळीत श्रेयस अय्यरने २८ चेंडूत ४२ धावा करत डावाला स्थिरता दिली. अक्षर पटेलनेही १४ चेंडूंत २४ धावा करत धावगती कायम ठेवली. त्यामुळे भारतीय संघाला विजयाच्या दिशेने वाटचाल करता आली. सामन्याच्या निर्णायक टप्प्यात नमन धीरने जबरदस्त फलंदाजी केली. त्याने अवघ्या १५ चेंडूंत नाबाद ४२ धावा ठोकल्या. त्याच्या खेळीत ५ चौकार आणि २ षटकार होते. नितीश कुमार रेड्डीने नाबाद २ धावा करत त्याला साथ दिली. भारताने १९.४ षटकांत लक्ष्य पूर्ण केले आणि दोन चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला.

# महाराष्ट्रातील शाळांना दिवाळी व उन्हाळी सुट्टीचे वेळापत्रक जाहीर



**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्य सरकारच्या माध्यमिक शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शाळांच्या सत्रांची रचना आणि विविध सुट्ट्यांबाबत अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या परिपत्रकानुसार जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त खासगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचे शैक्षणिक वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे शाळा प्रशासनासह विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना आगामी शैक्षणिक वर्षाचे आणि सुट्ट्यांचे सुयोग्य नियोजन करणे सुलभ होणार आहे.

दिवाळी सुट्टी - विद्यार्थी व शिक्षकांसाठी दिवाळीची दीर्घ सुट्टी सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ ते शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राहील. या १३ दिवसांच्या सुट्टीच्या काळात दिवाळी सणाचे महत्त्वाचे दिवस येतात. यामध्ये: धनत्रयोदशी: ६ नोव्हेंबर २०२६ दिवाळी पाडवा / बलिप्रतिपदा: १० नोव्हेंबर २०२६ भाऊबीज: ११ नोव्हेंबर २०२६. या सार्वजनिक आणि स्थानिक सुट्ट्यांचा समावेश दिवाळीच्या या दीर्घ सुट्ट्यांमध्येच करण्यात आला आहे.

उन्हाळी सुट्टी - द्वितीय सत्र संपल्यानंतर सोमवार, ३ मे २०२७ ते सोमवार, १४ जून २०२७ या कालावधीत शाळांना उन्हाळी सुट्टी राहील. त्यानंतर नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होईल.

# सप्तशृंग गडावर खासगी वाहनांना प्रवेशबंदी; कोजागिरी पौर्णिमेनिमित्त प्रशासनाचा निर्णय

**नाशिक (प्रतिनिधी)**– नाशिकमधील सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातून लाखो भाविक येत असतात. अलीकडेच नवरात्रोत्सव पार पडला. नवरात्रोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक देवीच्या दर्शनासाठी जात असतात. येत्या रविवारी कोजागिरी पौर्णिमा आहे. या दिवशी सुद्धा मंदिरामध्ये देवीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर येत असतात. अशातच कोजागिरी पौर्णिमेनिमित्त देवीच्या गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अलोट गर्दी लक्षात घेता, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने वाहन प्रवेशबंदीच्या कालावधीत बदल केला आहे.



त्याप्रमाणे, नांदुरी ते सप्तशृंगी गड या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस सोडून इतर वाहने, ऑटोरिक्षा शिवाय सर्व प्रकारच्या खासगी चारचाकी आणि दुचाकी वाहनांना शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ पासून सकाळी ६ वाजेपासून सोमवारी २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे. याबद्दलची माहिती नाशिक जिल्ह्याचे अपर जिल्हादंडाधिकारी रोहित कुमार राजपूत यांनी दिली आहे. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून भाविक येत असतात. २३ ऑक्टोबरपासून भाविकांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हीच शक्यता लक्षात घेऊन स्थानिक प्रशासनाने आधीपासूनच नियम लागू करायचे ठरवले आहे.

सप्तश्रृंग गडाचा घाट रस्ता अरुंद आणि वळणावळणाचा असल्यामुळे वाहतुक कोंडी होऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, या दृष्टीने प्रवेशबंदीच्या कालावधीत सुधारणा करण्याची विनंती स्थानिक परिस्थितीचा विचार करून करण्यात आली होती. अपर जिल्हादंडाधिकारी, नाशिक यांनी मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ११५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून यासंदर्भातील आदेशात अंशतः बदल केला आहे. यापूर्वी दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते २६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत प्रवेशबंदी लागू करण्यात आली होती. आधीच्याच नियमामध्ये सुधारणाकरून आता येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून लागू करण्यात आली आहे.

# बृहन्मुंबई हद्दीत २५ ऑक्टोबरपर्यंत जमावबंदी आदेश जारी

**मुंबइ (प्रतिनिधी)**– बृहन्मुंबईपोलीसआयुक्तालयाच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील अधिकारानुसार पोलीस उपआयुक्त (अभियान) यांनी बृहन्मुंबईपोलीसआयुक्तालयाच्या हद्दीमध्ये २५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत जमावबंदी आदेश जारी केला आहे.



या आदेशानुसार पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करणे, मिरवणूक काढणे, जमाव करुन ध्वनीवर्धकाचा, सांगितीय बँड, फटाके फोडणे यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. विवाह समारंभ आणि विवाह प्रथेशी संबंधित अन्य समारंभ, अंत्यविधी कार्यक्रम, कंपन्या, सहकारी संस्था आणि अन्य संस्था व संघटनांच्या कायदेशीर बैठका, क्लबमध्ये होणारे कार्यक्रम, सामाजिक मेळावे, सहकारी संस्था तसेच अन्य संस्थांच्या नियमित कामकाजाचा भाग म्हणून होणारे कार्यक्रम यांना या बंदी आदेशातून वगळण्यात आले आहे. चित्रपटगृहे, नाट्यगृहे तसेच सार्वजनिक मनोरंजनाची अन्य ठिकाणे, न्यायालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच अन्य शैक्षणिक संस्था, कंपन्या, कारखाने, दुकाने तसेच अन्य आस्थापनांमध्ये नियमित व्यापार, व्यवसाय या कारणांनी होणाऱ्या जमावास यातून वगळण्यात आले आहे. तसेच शांततापूर्ण मार्गाने मोर्चास पोलीसांनी परवानगी दिलेली असल्यास त्यासही या जमावबंदीतून वगळण्यात आले आहे, असे पोलीस उपायुक्त (अभियान) अकबर पठाण यांनी आदेशान्वये कळविले आहे.

**Change In Name**

My old Name is **SHAIKH ABDUL RAFE** which Now I am changing as new name **SHAIKH ABDUL RAFE ABDUL BAQHI.** Henceforth my All Correspondence will be done as per my new name please consider the same

**Address: S/O ABDUL BAQHI, 778, IDEGAHA GALLI,BILOLI Tq, Biloli, Dist,Nanded Maharashtra 431710.**

**Change In Name**

My old Name is **SAKSHEE RAHUL SAMLETI** Which now I am Changing as New Name **SAKSHEE DNYANESHWAR MADASWAR.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: H.No. 245, Sahyog Nagar, Work Shop Road, Near Buddha Vihar, Nanded 431605**

**Change In Name**

My old Name is **SHAIKH FAISAL** which Now I am changing as new name **SHAIKH FAISAL SHAIKH AHMED** Henceforth my All Correspondence will be done as per my new name please consider the same.

**Address: H. No 3396 narsi road, Near Old masjeed Deshmukh nagar Biloli Dist- Nanded 431710 Maharashtra**

**पासपोर्ट हरवला**

माझा सय्यद वहिदा बेगम सय्यद फारूक या नावाचा पासपार्ट क्र. एम ८७७५२१६ या क्रमांकाचा पासपोर्ट श्रीनगर ते एअरपोर्ट प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता –**
**सय्यद वहिदा बेगम सय्यद फारूक**
**घर क्र. १-१०-२१६, वर्कशॉप रोड, इकरा शाळेजवळ, निजाम कॉलनी नांदेड ४३१६०५ मो.नं. ९९२३४३३१४३**

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सुधाकर शंकरराव कदम यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५८९), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (८१) मालमत्ता नं. (२७९६) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (३२२०) साईज पूर्व-पश्चिम १३.० मीटर, दक्षिण-उत्तर ९.० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : ९ मी.चा रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ८४, दक्षिणेस : प्लॉट नं. ८२, उत्तरेस : प्लॉट नं. ८०.

श्री विठ्ठल अनिलराव धोंडगे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अंगुरी सुभाष आडे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (५२), गट नं. (९२), जुना वार्ड नं. (०२) मधील प्लॉट नं. (०५) मालमत्ता नं. (०२) नवीन वार्ड क्र. (३००७/६४) नवीन मालमत्ता नं. (०३) साईज पूर्व-पश्चिम २८.१८ मीटर व ५३.९७ मीटर, दक्षिण-उत्तर ७.६२ मीटर आणि २५ फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : गट नं. ५२, दक्षिणेस : प्लॉट नं.०४, उत्तरेस : प्लॉट नं.०६.

श्री विजय गुंडप्पा महाजन यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, भागवत परमेश्वर थडंगे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (...), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (६४३) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (१४६) साईज पूर्व-पश्चिम .. मीटर, दक्षिण-उत्तर .. मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : सरकारी रस्ता, पश्चिमेस : रस्ता, बोळ, दक्षिणेस : विजयकुमार, उत्तरेस : योगेश थडंगे

श्री पुंडलिकराव चिमणाजी थडंगे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, योगेश पुंडलिकराव थडंगे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५९१), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (२३६३/१) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (२९०३) साईज पूर्व-पश्चिम ६.१० मीटर, दक्षिण-उत्तर १२.१९ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : स्वतःची जागा, पश्चिमेस : प्लॉट नं. १७ व १६, दक्षिणेस : बाकी भाग, उत्तरेस : २० फुटाचा रस्ता.

श्री देविदास कोंडीबा अक्कमवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सुनिल देविदास कदम यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (२०२), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (८९) मालमत्ता नं. (बी १००७) नवीन वार्ड क्र. (१६) नवीन मालमत्ता नं. (२१३६/४/१) साईज पूर्व-पश्चिम १५.२४ मीटर, दक्षिण-उत्तर ६.१० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : प्लॉट क्र. १०५, दक्षिणेस : पैकी उर्वरीत भाग, उत्तरेस : प्लॉट क्र. ९०.

श्री लक्ष्मण भुमन्ना नडकुडवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, बाभळे शिवप्रसाद पि. बालासाहेब यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (५०), गट नं. (...), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (६२) मालमत्ता नं. (६३९/१७) नवीन वार्ड क्र. (०५) नवीन मालमत्ता नं. (डी. ६३९/१७) साईज पूर्व-पश्चिम ९.१५ प.९.२६ मीटर, दक्षिण-उत्तर १६.२७ उ.१३.९० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : गट नं. ५०५, दक्षिणेस : प्लॉट नं. ६३, उत्तरेस : २० फुटाचा रस्ता.

श्री बाभळे शिवप्रसाद बालासाहेब यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अवधुत लक्ष्मणराव जाधव यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (२३४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (५६) मालमत्ता नं. (एच१००६) नवीन वार्ड क्र. (१६) नवीन मालमत्ता नं. (१६९२) साईज पूर्व-पश्चिम १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : ६.१० मी. रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.३५, दक्षिणेस : प्लॉट नं. ५७, उत्तरेस : प्लॉट नं. ५५.

श्री सुशिल शिवराज मुगावे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, व्यंकटेश नागोराव जिल्हेवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५६४), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (५२) मालमत्ता नं. (२७७२/५२) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (१३७४/५२) साईज पूर्व-पश्चिम ३० फुट, दक्षिण-उत्तर - ३५ फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ५१, पश्चिमेस : प्लॉट नं. ५३, दक्षिणेस : प्लॉट नं. ५५, उत्तरेस : २० फुट रस्ता.

श्री पठाण सोहेलखान बंदेअलीखान यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सिकंदर बापूराव जाधव यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४६), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (...) मालमत्ता नं. (सी-८८७) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (४०१९) साईज पूर्व-पश्चिम ४० फुट व दक्षिण-उत्तर ३० फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : गट क्र. ४६ चा भाग, पश्चिमेस : ६.१० मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ०८, उत्तरेस : प्लॉट नं. ०६.

श्री मारोती गणपती गोरटकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



### खासगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची लूट

## दिवाळीत पुणे-मुंबईहून नांदेडसाठी विशेष रेल्वे सोडा

### किशोर देशमुख यांची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** दिवाळी सणानिमित्त पुणे व मुंबई येथून नांदेडकडे येणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता दोन्ही शहरांतून नांदेडसाठी येण्या-जाण्यासाठी प्रत्येकी किमान दोन विशेष रेल्वे गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुणे व मुंबई येथे शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त नांदेडसह मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी, नोकरदार आणि कामगार वास्तव्यास आहेत. दिवाळी सणासाठी ते आपल्या गावी परततात. मात्र नियमित रेल्वे गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असून, आरक्षण प्रतीक्षा यादीत असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही खासगी बस व ट्रॅव्हल्स चालक अवाजवी तिकीट दर आकारत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थी, कामगार आणि नोकरदार वर्गावर आर्थिक भार पडत असून, ही पिळवणूक थांबविण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

पुणे-नांदेड आणि मुंबई-नांदेड या दोन्ही मार्गांवर येण्या-जाण्यासाठी प्रत्येकी किमान दोन विशेष रेल्वे गाड्या सोडाव्यात, प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त डबे जोडावेत आणि खासगी ट्रॅव्हल्सकडून अवाजवी भाडे आकारणीच्या तक्रारींची चौकशी करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिवाळी सणात नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि परवडणारा प्रवास करता यावा यासाठी रेल्वे प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.

यावेळी निलेश कुंटूरकर, आदित्य शिरफुले, श्रीकांत राठोड, लक्ष्मण कल्याणकर, नवनाथ कपाटे, आशिफ खान, समद खान, श्याम कदम देशमुख आणि किरण मुत्तेपवार उपस्थित होते.

## चिदगिरी सज्जाच्या लाचखोर तलाठ्यास रंगेहात पकडले

**नांदेड (प्रतिनिधी)–** पत्नीच्या नावे असलेली शेतजमीन स्वतःच्या नावे लावण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याकडे १२ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भोकर येथे रंगेहात पकडले आहे.

साठ वर्षीय तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे चिदगिरी, ता. भोकर येथील गट क्र. २९० मध्ये ८० आर शेती आहे. पत्नीचा मृत्यू झाल्याने ती जमीन स्वतःच्या नावे करण्यासाठी तक्रारदार दि. २१ ऑक्टोबर रोजी भोकर येथील तलाठी कार्यालयात ग्राम महसूल अधिकारी साहेबराव हैबती टोमके, सज्जा चिदगिरी यांना भेटले.

यावेळी तलाठी टोमके यांनी वारसदारांचे ५०० रुपयांच्या बॉन्ड पेपरवर संमतीपत्र आणि १२ हजार रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने दि. २२ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.

दि. २२ ऑक्टोबर रोजी दुपारी ४.३० वाजता तलाठी कार्यालय, भोकर येथे पडताळणी केली असता तलाठी टोमके यांनी १२ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तडजोडीअंती ५ हजार रुपये लागलीच आणि उर्वरित ७ हजार रुपये दोन दिवसांनंतर स्वीकारण्याचे मान्य केले. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता सापळा रचून तलाठी टोमके यांनी तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच त्यांना ताब्यात घेण्यात आले.

याप्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येणार आहे. आरोपी तलाठ्याला अटक करण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, पोलीस उपअधीक्षक राहुल तरकसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रिती जाधव, हवालदार बालाजी मेकाले, अमोल टाक, विनय नुकलवार, चालक पोहेकॉ. रमेश नामपल्ले यांनी पार पाडली.

## तमलूर येथील जुगार अड्ड्यावर धाड; ८ जणांवर गुन्हा दाखल, १.८६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी, देगलूर यांच्या पोलीस पथकाने मौजे तमलूर येथील मोकळ्या जागेत सुरू असलेल्या बेकायदेशीर तिर्रट जुगार अड्ड्यावर धाड टाकून एकूण १ लाख ८६ हजार ५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बुधवार, दि. २१ ऑक्टोंबर २०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांना गोपनीय माहिती मिळाली की, तमलूरमधील नवी आबादी येथील सचिन नामावार यांच्या शेतातील टिनपत्राचे शेड समोरील मोकळ्या जागेत काही इसम बेकायदेशीररीत्या 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस पथकाने सदर ठिकाणी जाऊन कारवाई केली असता, आरोपी नितीन हनमंत नामावार, वय ३३ वर्षे, अरुण नागनाथराव मुंडकर, वय २९ वर्षे, अर्जुन सुरेश तोटावार, वय २२ वर्षे, हर्ष सुरेश तोटावार, वय २४ वर्षे, किरण मोहन माचीनवार, विठ्ठल बैलकर, शेख जहागीर, सचिन हनमंत नामावार, सर्व राहणार तमलूर, देगलूर हे मिळून आले.

आरोपींकडून व घटनास्थळावरून पोलिसांनी पंचासमक्ष कारवाई करून सात मोबाईल फोन अंदाजे किंमत-१ लाख १७ हजार, ३ मोटारसायकल (MH-२६-५३१७), (MH-०८-K-२२७१), (MH-२६-M-८९७५) (अंदाजे किंमत-६४ हजार), रोख रक्कम ५ हजार ५० रुपये व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ८६ हजार ५० रुपयांच्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी नमूद आरोपींविरुध्द पोलीस ठाणे देगलूर गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१४/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने किरण पोपळघट, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ, महिला पोउपनि किरण बेंबडे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार बेग, पंडीत बळदे व होमगार्ड कोरेवार सर्व नेमणूक देगलूर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

अवैध जुगार, मटका तसेच इतर बेकायदेशीर प्रकारांविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या अवैध हालचालींची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड जिल्हा पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## अशोकनगर समोरील चौकाला 'स्वातंत्र्यवीर सावरकरांचे' नाव द्या

### निखिल लातूरकर यांचे महापौरांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील अशोकनगर गेट क्रमांक १ समोरील चौकाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर चौक' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिका आयुक्त आणि महापौरांना निवेदन दिले आहे.

मातृभूमीवरील अस्सीम प्रेम, राष्ट्राप्रती अढळ निष्ठा आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व समर्पित करण्याची जाज्वल्य प्रेरणा देणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशोकनगर परिसरातील एका चौकाला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी भूमिका लातूरकर यांनी निवेदनातून मांडली आहे.



'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला!' या सावरकरांच्या अजरामर काव्यपंक्तींमधून मातृभूमीविषयीची उत्कट ओढ आणि राष्ट्रनिष्ठेची प्रखर भावना आजही प्रत्ययास येते. त्यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, धैर्य आणि देशभक्तीचा प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांच्या कार्यातून युवा पिढीला केवळ देशावर प्रेम करण्याचीच नव्हे, तर राष्ट्रहितासाठी कृतिशील होण्याची प्रेरणाही मिळते. त्यामुळे त्यांच्या नावाने चौकाचे नामकरण करणे ही केवळ नामफलकापुरती मर्यादित बाब नसून, राष्ट्रप्रेरणेचा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न असल्याचे लातूरकर यांनी नमूद केले.

अशोकनगर परिसरात तत्कालीन नगरपालिकेने सावरकर प्रतिष्ठानसाठी जागा उपलब्ध करून दिली होती. गेल्या तीन ते चार दशकांपासून या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अशोकनगर गेट क्रमांक एकसमोरील चौकाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

या मागणीला मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रभाग क्रमांक ५ मधील भाजपचे नगरसेवक ॲड. महेश कनकदंडे, साहेबराव गायकवाड, जयश्री पावडे आणि शांभवी साले यांनी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नामकरणाचा ठराव मांडून तो मंजूर करून घ्यावा, असे आवाहनही लातूरकर यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांचा वीजपुरवठा आठ तास सुरू ठेवा -खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांचा शेतीसाठी देण्यात येणारा वीज पुरवठा दररोज सलग ८ तास करण्यात यावा, तसेच वीज बिल प्रलंबित असल्याच्या कारणावरून शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडण्यात येऊ नये, या मागण्यांसाठी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी पुढाकार घेतला आहे.

नांदेड तालुक्यातील ३३ के. व्ही. सबस्टेशनमधून निघणाऱ्या ११ के.व्ही. रूई फिडरवरील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा प्रश्न तसेच नायगावसह विविध तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या वीजविषयक समस्या त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी नायगावसह इतर तालुक्यांतील शेकडो शेतकरी, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी नेते आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड तालुक्यातील ३३ के.व्ही. सबस्टेशनमधून निघणाऱ्या ११ के.व्ही. रूई फिडरवर वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने बळेगाव, इजतगाव, मनूर, जांभरवाडी, सायखेड, रूई बुद्रुक आणि रूई खुर्द येथील सुमारे १०० ते १२५ शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या फिडरवर एक तासही सलग वीज उपलब्ध होत नसल्याने शेतातील पिकांना पाणी देणे कठीण झाले होते. अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतीची कामे खोळंबत असून, पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत होती. या गंभीर समस्येबाबत काँग्रेसचे पदाधिकारी आणि शेतकऱ्यांनी खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत खासदार चव्हाण यांनी महावितरणचे प्रभारी अधीक्षक अभियंता गाडेकर यांच्याशी संपर्क साधून रूई फिडरवरील शेतकऱ्यांना सलग आठ तास अखंडित वीजपुरवठा देण्याच्या सूचना दिल्या.

नायगावसह विविध भागांतील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या वीज कनेक्शनच्या समस्येचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. शेतकऱ्यांनी वीज कोटेशन भरलेले असतानाही वीजबिल प्रलंबित असल्याच्या कारणावरून काही शेतकऱ्यांना केवळ वायर परत करण्याची सूचना मिळाल्याने त्यांच्यासमोर अडचणी निर्माण झाल्या असेही खा. रविंद्र चव्हाण यांनी म्हटले आहे.

## नांदेड रेल्वे विभागात ७१ स्थानकांवर 'रेल जनसंवाद'; प्रवाशांच्या सूचना, स्वच्छता अभियान उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वच्छता अभियान ६.० अंतर्गत भारतीय रेल्वेच्या वतीने देशभरातील रेल्वे स्थानकांवर 'रेल जनसंवाद' आणि स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील ७१ रेल्वे स्थानकांवर हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वाशिम, आदिलाबाद, अकोला यांसह इतर स्थानकांचा समावेश होता.

रेल्वे अधिकारी, प्रवासी आणि विविध भागधारक यांच्यात थेट संवादासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा 'रेल जनसंवाद'चा मुख्य उद्देश होता. प्रवाशांच्या अपेक्षा जाणून घेणे, रेल्वे सेवा व प्रवासी सुविधांबाबतच्या सूचना-तक्रारी प्राप्त करणे आणि कोणत्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक आहे याचा आढावा घेण्यात आला. तसेच स्थानकांवरील स्वच्छता, रेल्वे परिसराचा जबाबदारीने वापर आणि स्वच्छता टिकवण्यासाठी प्रवाशांचा सक्रिय सहभाग याबाबत जनजागृती करण्यात आली.

हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी जनसंवादात सहभाग घेतल्यानंतर स्वच्छता उपक्रमातही प्रत्यक्ष सहभाग घेतला.

परभणी स्थानकावर अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक सी. एच. कल्याण राजू, पूर्णा स्थानकावर मुख्य वैद्यकीय अधीक्षक एम. श्रीनिवास तर छत्रपती संभाजीनगर स्थानकावर वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीपकुमार दास यांनी प्रमुख पाहुणे म्हणून सहभाग घेतला. या कार्यक्रमात DRUCC, माजी DRUCC व ZRUCC सदस्य, स्वयंसेवी संस्था, प्रवासी संघटना, चेंबर ऑफ कॉमर्स, व्यापारी संघटना, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

जनसंवादादरम्यान प्रवाशांनी प्रवासी सुविधा, स्वच्छता, स्थानकांवरील सुविधा, गाड्यांच्या सेवा आदी विषयांबाबत सूचना व तक्रारी मांडल्या. प्राप्त सर्व सूचना संबंधित विभागांकडून संकलित करून प्रचलित नियम व व्यवहार्यता लक्षात घेऊन सुधारात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे. जनसंवादानंतर स्थानक परिसर, प्लॅटफॉर्म आणि प्रवासी भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यावेळी बोलताना डीआरएम प्रदीप कामले म्हणाले, रेल्वे सेवा अधिक सक्षम व प्रवाशाभिमुख करण्यासाठी प्रवाशांशी सातत्यपूर्ण संवाद महत्त्वाचा आहे. 'रेल जनसंवाद' ही प्रवाशांच्या गरजा थेट जाणून घेण्याची आणि समस्या सोडवण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे तर सामूहिक आणि सामाजिक जबाबदारी बनली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

## दुष्काळाचा फटका मजुरांनाही; हमाल, रिक्षाचालक, फेरीवाल्यांसाठी मदतीची मागणी- बालाजी चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यामुळे रोजमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या मजुरांवर आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे या मजुरांना तत्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष बालाजीराव चव्हाण यांनी शासनाकडे केली आहे.

चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची आर्थिक मदत आणि कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांप्रमाणेच रोजमजुरी करणाऱ्यांचीही परिस्थिती वेगळी नाही. दुष्काळामुळे हाताला काम नसल्याने मजुरांना कामासाठी भटकंती करावी लागत आहे. कामे मिळत नसल्याने त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीच्या धर्तीवर हमाल, मापाडी, हातगाडेवाले, रिक्षाचालक, चर्मकार, बुटपॉलिश करणारे, भाजीपाला विक्रेते, गवंडी, फुटाणे-खरमुरे विक्रेते, वीटभट्टी कामगार, ऊसतोड कामगार, फुले विक्रेते, छोटे हॉटेलचालक, पानटपरीवाले, वृत्तपत्र विक्रेते, धुणी- भांडी करणाऱ्या मजुरांवर दुष्काळाचा मोठा परिणाम होत असल्याचेही या निवेदनात म्हटले आहे.

## विनयभंग प्रकरणी २४ तासांत आरोपपत्र दाखल; नराधमाला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** महिला सुरक्षेबाबत नांदेड पोलिसांनी कठोर भूमिका घेत भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या विनयभंग प्रकरणातील आरोपीवर अवघ्या २४ तासांत न्यायालयात संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दोषारोपपत्र दाखल केले आहे.

दि. २१ ऑक्टोबर रोजी फिर्यादी अल्पवयीन मुलगी व तिचा भाऊ शाळेतून घरी परतत असताना आरोपी नंदकिशोर लक्ष्मण पंढरे (वय २०, रा. संभाजीनगर, कंधार, जि. नांदेड) याने तिचा वारंवार पाठलाग करून रस्ता अडवला आणि मला तू आवडतेस असे म्हणत विनयभंग केला.

याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६०९/२०२६, कलम ७८ भारतीय न्याय संहिता सह कलम १२ पोक्सो अधिनियम अन्वये तात्काळ गुन्हा नोंदवून तपास पोउपनि साहेबराव कसबेवाड यांच्याकडे सोपविण्यात आला.



तपास अधिकाऱ्यांनी वेगाने चक्रे फिरवत आरोपीला अटक केली. घटनास्थळ पंचनामा, महत्त्वपूर्ण साक्षीदारांची तपासणी करून कलम १८३ बीएनएसएस अन्वये जबाब नोंदवून आरोपीला नांदेड कारागृहात दाखल करण्यात आले.

## बाबुराव हातागळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग उमरखेड येथे सेवानिवृत्त कर्मचारी बाबुराव लक्ष्मण हातागळे यांचे गुरुवारी दुपारी २ वाजता हृदयाविकाराच्या झटक्याने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातू, १ भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वाजता त्यांचे राहते घर येथून निघून गोवर्धन घाट नांदेड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## सिडको, हडको भागातील दुर्गा माता मूर्तींचे विसर्जन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील व सिडको-हडको भागातील सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांच्या दुर्गा माता मूर्तींचे मुख्य मार्गावरून गरबा दांडिया खेळत महिलांच्या मोठ्या सहभागाने रात्री उशिरापर्यंत किवळा साठवण तलाव येथे विसर्जन करण्यात आले.

यावेळी जागोजागी प्रसाद व पाणी वाटप करण्यात आले तर ग्रामीण पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल संधू, क्षेत्रीय कार्यालय सिडको सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व मनपा कर्मचारी यांच्या उपस्थितीत मनपाने बॅरिकेड्स व जेसीबी सहाय्याने दुर्गा माता विसर्जन व्यवस्था केली होती.



ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील सिडको हडको असदवन, वाघाळा, जुना कौठा, नवीन कौठा या शहरी भागात परवाना ६२ व विनापरवना १०२ अशा एकूण १६४ सार्वजनिक नवरात्रोत्सव दुर्गा मंडळांनी तर ग्रामीण भागातील धनेगाव, वाजेगाव, तुप्पा यासह ग्रामीण भागातील विनापरवाना व परवाना सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ यांनी नोंदणी केली होती.

सिडको व हडको भागातील सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी आकर्षक व सुबक मोठ्या मूर्ती हैदराबाद, तेलंगणा व परजिल्ह्यातील यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड, लोहा तालुक्यातून आणल्या होत्या. सिडको व हडको भागातील नवयुवक दुर्गा, छत्रपती दुर्गा, माता वैष्णवी देवी, नवयुवक दुर्गा, श्री सप्तशृंगी देवी, श्री नृसिंह दुर्गा, शिवनेरी दुर्गा, अयोध्या दुर्गा, वैभव नवदुर्गा, त्रिपूर वासनी दुर्गा माता महोत्सव यासह सिडको-हडको भागातील विविध दुर्गा महोत्सव मंडळांनी मुख्य सार्वजनिक मिरवणुकीत सहभागी होत ढोल ताशांच्या गजरात दांडीया व गरबा खेळत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com